**( इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )**

**<u>प्रकाशनयोग्य</u>**

भारतीय सर्वोच्च न्यायालय यांचे फौजदारी अपिलीय अधिकार क्षेत्रात

<u>फौजदारी अपील क्र. 1375-1376 /2013</u>

एशियन रिसर्फेसिंग ऑफ रोड एजन्सी
प्रायव्हेट लि. आणि इतर ... अपीलकर्ते

विरुद्ध

केंद्रीय तपास यंत्रणा ..... उत्तरार्थी

**<u>सह</u>**

फौजदारी अपील क्रमांक १३८३/२०१३, १३८२/२०१३, १३९४/२०१३, १३८४/२०१३, १३८४/२०१४, १३८४/२०१३, १३९३/२०१३, १३८६१३८७/२०१३, १३८५/२०१३, १४०६/२०१३, १३९६/२०१३, १३९५/२०१३, १३९१/२०१३, १३८९/२०१३, १३८८/२०१३, १३९८/२०१३, १३९७/२०१३, विशेष अनुमती याचिका (फौजदारी)क्र. २६१०/२०१३, फौजदारी अपील क्र.१३९०/२०१३, १३९९/२०१३, १४०२/२०१३ १४००/२०१३, १४०१/२०१३, १४०४/२०१३, १४०३/२०१३, १४०५/२०१३, विशेष अनुमती याचिका (फौजदारी) क्र. ६८३५/२०१३, ६८३४/२०१३, ६८३७/२०१३, ६८३७/२०१३, फौजदारी अपील क्र. ३८८/२०१४, विशेष अनुमती याचिका (फौजदारी) क्र. १०००५०-१००५१/२०१३, ९६५२,९६५३/२०१३, फौजदारी अपील क्र.५६७८/२०१४, १४५१/२०१४, १३९९/२०१४, २५०८/२०१४, २९७०/२०१४, २५०७/२०१४, २९३९/२०१४, २९७७/२०१४, ४७०९/२०१४, ६३७२/२०१४, ३९१/२०१४, ६६९१-६६९२/२०१४ आणि ९३६३/२०१७

# **न्यायनिर्णय**

**न्यायाधीश आदर्श कुमार गोयल**

**फौजदारी अपील क्र. १३७५-१३७६/२०१३**

१. ९ सप्टेंबर २०१३ रोजी दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने दिलेल्या आदेशानुसार तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर ही अपील दाखल करण्यात आली आहेत ते पुढीलप्रमाणे:

"परवानगी देण्यात आली आहे.

*या न्यायालयाच्या विविध खंडपीठांमध्ये तसेच सर्व उच्च न्यायालयांमध्ये लक्षणीय मतभेद असलया बाबत पक्षकारांच्या विद्वान अधिवक्ते सहमत आहेत. विशेष अनुमती याचिका (फौजदारी) क्र. 6470 च्या फौजदारी अपील याचिकेतील याचिकाकर्त्याची बाजू मांडणारे ज्येष्ठ अधिवक्ता राम जेठमलानी निवेदन करतात की दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने दिलेले पुढील निर्णय अनिश्चित काळासाठी आहेत आणि मोहनलाल मगनलाल ठाकूर विरुद्ध गुजरात राज्य [(1968) 2 एससीआर 685] पासुन उद्भवणारे निर्णयात नमूद केलेलया कायद्याच्या*

*प्रमाणाच्या विरोधातील आहेत.*

*या दृष्टीकोनातून, आम्हाला असे वाटते की हे मुद्दे बहुसदस्यीय पीठाकडे पाठवणे आणि त्यावर सुनावणी घेणे योग्य ठरेल. योग्य त्या आदेशांसाठी हे प्रकरण माननीय सरन्यायाधीशांसमोर ठेवण्याचे निर्देश कार्यालयाला देण्यात येत आहेत.*

*दरम्यान, सत्र न्यायालयासमोरील पुढील कार्यवाही स्थगित राहील."*

२. कायद्याचा प्रश्न सर्व प्रकरणांमध्ये सारखाच असल्याने, आम्ही ही बाब विचारात घेतली आहे. संदर्भित प्रश्नाच्या उत्तराच्या पार्श्वभूमीवर संदर्भित प्रश्नाबरोबर इतर सर्व बाबी योग्य त्या खंडपीठाकडून गुणवत्तेनुसार निकाली काढण्यासाठी विचारात घेतल्या जातील.

३. तथ्ये थोडक्यात, दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेकडे ७ मार्च २००१ रोजी एफआयआर नोंदवण्यात आला. सन १९९७ आणि १९९८ दिल्ली मध्ये सीबीआय/एसआययू-VIII/नवी दिल्ली शाखा भारतीय दंड संहितेच्या कलम १२० बी सह, ४२०,४६७,४६८,४७१, आणि ४७७ए आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ (पीसी कायदा) च्या कलम १३ (२) आणि १३ (१) अंतर्गत अपीलकर्ता आणि दिल्ली महानगरपालिका (एमसीडी) च्या निर्देशानुसार

अपीलकर्ता आणि एमसीडीच्या काही अधिका-यांविरुद्ध रस्त्यांच्या “डेन्स कार्पेटिंग वर्क्स” मध्ये वापरण्यासाठी बिटुमेनच्या वाहतुकीशी संबंधित तेल कंपन्यांच्या बनावट पावत्या वापरून एमसीडीचे नुकसान केल्याचा आरोप केला आहे.

४. तपासानंतर प्रतिवादी- सीबीआयने २८नोव्हेंबर २००७ रोजी विशेष न्यायाधीश, सीबीआय, नवी दिल्ली यांच्यासमोर अपीलकर्ता आणि एमसीडीच्या काही कर्मचाऱ्यांविरोधात आरोपपत्र दाखल केले.अपीलकर्त्यांनी विशेष न्यायाधीश, सीबीआय यांच्याकडे (वगळण्यासाठी) दोषमुक्तीसाठी अर्ज दाखल केला. १ फेब्रुवारी २००७ रोजी विशेष न्यायाधीश, सीबीआय यांनी न्यायालयासमोरील त्तथ्यांचा विचार करून आरोप निश्चित करण्याचे निर्देश दिले. याचिकाकर्ता आणि इतर आरोपींविरोधाक सकृतदर्शनी गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोप निश्चित करण्याच्या आदेशाविरोधात अपीलकर्त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयात फौजदारी पुनरीक्षण क्रमांक ३२१/२००७ दाखल केला. सदर पुनरीक्षण याचिका ही रिट याचिका (फौजदारी) क्रमांक ३५२/ २०१० मध्ये रूपांतरित करण्यात आली.

५. *विद्वान एकल न्यायाधीशांनी विभागीय खंडपीठाच्या विचारार्थ*

*कायदयाच्या खालील प्रश्नाचा संदर्भ दिला:*

*"भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींनुसार विशेष न्यायाधीशांनी तयार केलेला आरोप अंतरिम  आदेश आहे  का , आणि जेव्हा फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत आदेश किंवा याचिकेविरुध्द  पुनरीक्षण करता येत  नाही, तेव्हा भारतीय संविधानाच्या  कलम  २२६/२२७ अंतर्गत, केलेल्या गुन्ह्यांमध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील गुन्ह्यांव्यतिरिक्त भारतीय दंड संहितेतील गुन्ह्यांचा समावेश केलेला असो किंवा नसो, अशा आदेशाला आव्हान दिले  केले जाऊ शकते का ? ''*

६. विद्वान एकल न्यायाधीशांन धरमबीर खट्टर  विरुद्ध सेंट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्गेशन् आणि आर.सी. सबरवाल विरुद्ध सेंट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्गेशन मधील उच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या दोन एकल खंडपीठाच्या निर्णयांमध्ये घेतलेल्या परस्परविरोधी मतांचा संदर्भ दिला. निदर्शनास आले ते असे:

'' तथापि,  न्यायमूर्ती जैन यांच्या खंडपीठाने सभरवाल (उपर्युक्त) या प्रकरणात व्यक्त केलेले आणि धरमवीर खट्टरच्या खटल्यात  न्यायमूर्ती मुरलीधर यांच्या खंडपीठाने (उपर्युक्त) व्यक्त केलेले असे दोन मतप्रवाह असल्याने, माझ्या मते बहुसदस्यीय  खंडपीठाद्वारे  वाद सोडवायला हवा होता.''

७. ***धरमबीर खट्टर*** (उपर्युक्त) मध्ये एकल न्यायाधीशांचे मत खालीलप्रमाणे आहे:

*" ३२.चर्चेच्या या भागाचा निष्कर्ष काढण्यासाठी असे निर्णीत केले जाते की, कलम १९ (३) (सी) च्या संदर्भात ""कोणत्याही चौकशीत, खटल्यात पारित केलेल्या कोणत्याही अंतरिम आदेशाच्या संदर्भात कोणताही न्यायालय पुनरावलोकनाच्या अधिकारांचा वापर करू शकत नाही....."यात दोषारोप किंवा दोषारोप निश्चित करण्याच्या आदेशाच्या स्वरुपात अंतरिम आदेशाचा समावेश आहे.* ***व्ही. सी. शुक्ला आणि सत्य नारायण शर्मा*** *यांच्या निर्णयांचे एकत्रित वाचन करताना, असे मानले सांगण्यात आले की, कलम १९ (३) (सी) च्या संदर्भात, विशेष न्यायालयाने आरोप निश्चित केल्याच्या किंवा दोषारोपत्रावरील आदेशाविरोधात उच्च न्यायालयात कोणतीही पुनरावलोकन याचिका दाखल केली जाणार नाही.*

*३३. म्हणूनच, या न्यायालयाचा दृष्टिकोन लक्षात घेता, सध्याच्या याचिकांच्या विचारार्थ सीबीआयचा प्राथमिक आक्षेप कायम ठेवणे आवश्यक आहे....."*

*८.* **आर. सी *सभरवाल (उपर्युक्त) या खटल्यात विद्वान एकल न्यायाधीशांनी असे मत व्यक्त केले की,*** एखाद्या अंतरिम

आदेशाविरुद्ध पुनरिक्षण केले जाऊ शकत नसले तरी, संविधानाच्या कलम २२६ आणि २२७ अंतर्गत घटनात्मक उपायाला कोणतेही प्रतिबंध नाही. त्याचबरोबर सीबीआय विरुद्ध रविशंकर श्रीवास्तव, धारिमल टोबॅको प्रोडक्ट्स लिमिटेड आणि इतर विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि अन्य विरुद्ध मधू लिमये विरुद्ध महाराष्ट्र राज्य, कृष्णन विरुद्ध कृष्णवेणी आणि राज्य विरुद्ध नवज्योत संधू इतर या मधील न्यायालयाच्या निर्णयांच्या पार्श्वभूमीवर कायद्यातील स्पष्ट प्रतिबंधास डावलून कलम ४८२ अन्वये प्रदत्त शक्तीचा वापर करता येणार नाही.

९. असे नोंदविण्यात आले की,

*" ३७. **नवज्योत सिंग संधू** (उपर्युक्त) प्रकरणातील अधिकारी निर्णयानंतर आणि **मधू लिमये (उपर्युक्त) प्रकरणात** सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या निर्णयांच्या पार्श्वभूमीवर, उच्च न्यायालय फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२मध्ये मान्यता प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर फौजदारी प्रक्रियेच्या संहितेव्यतिरिक्त इतर वैधानिक अधिनियमात समाविष्ट असलेल्या अभिव्यक्त प्रतिबंधास डावलून केला जाऊ शकत नाही.फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२मध्ये उच्च न्यायालयाच्या अंगभूत अधिकारांना फौजदारी प्रक्रिया संहितेमध्ये समाविष्ट असलेल्या इतर कोणत्याही तरतुदींद्वारे मर्यादित केले*

*गेले नाही, हे ''या संहितेत नसलेले '' शब्दांच्या वापरावरून स्पष्ट होते, परंतु जेव्हा अशा अधिकारांचा वापर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १९ (३) (सी) सारख्या इतर वैधानिक अधिनियमांमध्ये असलेल्या कायदेशीर अधिनियमांच्या विरोधात असेल तेव्हा फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ तर्गत असलेल्या अधिकारांचा वापर केला जाऊ शकत नाही.*

*'' २९. पक्षकारांच्या सुनावणीशी संबंधित प्रक्रियात्मक पैलू कलम २२ मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे हे तथ्य कलम १९ (३) (सी) पीसीए च्या हेतूंसाठी आरोपपत्रावरील आदेश हा अंतरिम आदेश असेल की नाही यावर प्रकाश टाकत नाही.दोन्ही तरतुदींचे एकत्रित वाचन असे सूचित करते की आरोपमुक्त करण्याच्या आदेशाच्या संदर्भात आरोपीला आरोपमुक्त करण्याचा आदेश हा कदाचित अभियोगाच्या सूचनेनुसार पुनरावलोकन याचिकेचा विषय असू शकतो असे दर्शविते. कायद्याच्या सर्व तरतुदींना अर्थ द्यायचा असल्यामुळे, या तिन्ही तरतुदींच्या सामंजस्यपूर्ण विवेचनातून असे सूचित होते की उच्च न्यायालयात पुनरावलोकन याचिकेद्वारे ज्या प्रकारच्या आदेशांना आव्हान दिले जाऊ शकते ते सत्य नारायण शर्मा यांच्या प्रकरणात स्पष्ट केल्याप्रमाणे बऱ्याच प्रमाणात संक्षिप्त केले गेले आहे.''*

पुढे **नागेंद्र नाथ बोरा** ***विरुद्ध पर्वतीय विभाग आणि अपील आयुक्त, आसाम, ए. आय. आर. १९५८ एस्. सी. ३९८*** *निबरन चंद्र*

*बाग विरुद्ध महेंद्रनाथ घुघू, ए. आय. आर. १९६३ एस्. सी. १८९५ सरपंच, लोणंद ग्रामपंचायत विरुद्ध रामगिरी गोसावी आणि अन्य, ए. आय. आर. १९६८ एस्. सी. २२२ मारूती बाला राऊत विरुद्ध दशरथ बाबू वाथरे आणि अन्य, (१९७४) २ एस. सी. सी. ६१५ सादमाल रायचंद ओसवाल विरुद्ध लक्ष्मीबाई आर. टार्टे आणि अन्य, ए. आय. आर १९७५ एस्. सी. १२९७ जागीर सिंग विरुद्ध रणबीर सिंग आणि एनआर., एआयआर १९७९ एससी ३८१; विशेष कुमार विरुद्ध शांती प्रसाद, एआयआर १९८० एस्. सी. ८९२; खलील अहमद बशीर अहमद विरुद्ध तुफेलहुसेन समासभाई सारंगपुरवाला, एआयआर १९८८ एस. सी. १८४; एम.सी. मेहता विरुद्ध कमलनाथ आणि अन्य , एआयआर २००० एस. सी. १९९७आणि रणजीत सिंग विरुद्ध. रवि प्रकाश,एआयआर २००४ एस. सी. ३८९२, यात असे निदर्शनास आले की :*

" २५.. भ्रष्टाचाराच्या खटल्यांच्या सुनावणीला सहजासहजी परवानगी दिली जात नाही आणि भ्रष्टाचाराच्या खटल्याच्या सुनावणीला 20 वर्षे लागतात हे सर्वज्ञात आहे. या स्थितीचे एक प्रमुख कारण म्हणजे जेव्हा आरोप निश्चित केले गेल्या क्षणालाच प्रत्येक खटला उच्च न्यायालयात

जाईल आणि आरोप निश्चित करण्याच्या आव्हान दिले जाते  आणि अशा उच्च न्यायालयला  फेरविचार याचिकांवर निर्णय घेण्यासाठी कित्येक वर्षे लागतात आणि खटल्यांना मिळत राहते.  या स्थितीचा विचार करून विधिमंडळाने अशी तरतूद केली की, अंतरिम  आदेश हे पुनरावलोकन याचिकेचा विषय असू शकत नाही. वरील कारणांमुळे या न्यायालयाने परिच्छेद क्रमांक ३ आणि ४ मध्ये सध्याच्या परिस्थितीचा विचार करून निष्कर्ष काढला होता की आरोप निश्चित करण्याच्या आदेशाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध कोणताही पुनरावलोकन होणार नाही. त्याचप्रमाणे, दाखल केलेल्या  याचिकेला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२  लागू होत नाही. माझे असे मत आहे की, एकदा या न्यायालयाने कलम २२७ अंतर्गत याचिका लागू होईल असे मान्य केले की , वरील याचिकांमधून हे स्पष्ट होईल की, पुनर्विलोकनाच्या  माध्यमातून आरोप लावण्यात आलेल्या प्रत्येक आदेशावर घटनेच्या कलम २२७ अन्वये छद्म पद्धतीने हल्ला केला जाईल आणि त्याचा परिणाम असा होईल की, कार्यावाही न्यायचौकशी न्यायालयासमोर चालू शकणार नाही.

२६. दोषारोपाविरुद्ध दाखल याचिकेवरील निर्णयासाठी सीबीआयने गोळा केलेल्या मोठ्या प्रमाणावरील पुराव्याची तपासणी करणे, प्रत्येक आरोपीच्या विरोधात असलेल्या पुराव्याचे विश्लेषण करणे आणि त्यानंतर आरोपी दोषी

होता की नाही हे ठरवणे आवश्यक असते. हे काम विशेष न्यायाधीशांनी सकारण आदेश देऊन केले जाते.भ्रष्टाचार प्रतिबंधक प्रकरणांतर्गत विशेष न्यायाधीशांचा प्रत्येक दोषारोपत्रावरील आदेश साधारणपणे ४० ते ५० पानांचा असतो जेथे पुराव्यावर तपशीलवार चर्चा केली जाते आणि त्यानंतर आरोप निश्चित करण्याचा आदेश दिला जातो. जर सीबीआयने गोळा केलेल्या पुराव्याचे पुनर्मूल्यांकन आरोप निश्चित केले जाण्याची आवश्यकता आहे की नाही हे पाहण्यासाठी हे न्यायालय घटनेच्या कलम २२७ अंतर्गत याचिका स्वीकारत असेल किंवा प्रत्यक्षात न्यायालय असे करत असेल तर ते वैधानिक हेतूच्या विरोधी असेल. कुठल्याही खटल्यातील संपूर्ण अभिलेखाची तपासणी केल्याशिवाय कोणतेही न्यायालय युक्तिवादाचे मूल्यमापन करू शकत नाही. अशा याचिकांमध्ये अधिकार क्षेत्र आणि विसंगतीचे मुद्दे केवळ याचिका दाखल करून घेण्यासाठी उपस्थित केले जातात. अधिकारक्षेत्राचा मुद्दयाचा क्वचितच समावेश असतो. कोणत्याही यथायोग्य लिखित न्यायनिर्णयाच्या संदर्भात एखाद्या आदेशाचा विपर्यास होऊन युक्तिवाद केला जाऊ शकतो कारण विपर्यास ही एक अशी संज्ञा आहे ज्याचा अर्थ व्यापक आहे आणि जो आदेश याचिकाकर्त्याच्या बाजूने अनुकुल नसतो तो नेहमीच त्याच्या व त्याच्या अधिवक्ताद्वारे विपर्यस्त मानला जातो. म्हणूनच, आरोपावरील आदेशाविरोधात घटनेच्या कलम २२७ अंतर्गत

याचिकेवर विचार करणे म्हणजे अप्रत्यक्षपणे तेच काम करणे आहे जे थेट केले जाऊ शकत नाही, कलम २२७ अंतर्गत कोणत्याही याचिकेवर विचार केला जाऊ शकत नाही असे मी मानतो.

१०. खंडपीठाने आक्षेपित न्यायनिर्णय विचारलेल्या प्रश्नांची पुनर्रचना खालीलप्रमाणेः

*"(अ) **१९८८** च्या कायद्यांतर्गत दोषारोप निश्चित करणाऱ्या आदेशाला या न्यायालयाच्या पुनरिक्षण शक्तीचा वापर करण्यापासून रोखणारा एक अंतर्वादिक आदेश म्हणून मानले जाईल की नाही?*

*(ब) **१९८८** च्या कायद्याच्या कलम १९ मध्ये वापरण्यात आलेली भाषा जी पुनर्रचनेला प्रतिबंधित करते ती सर्व कारणांसाठी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत शक्तीचा वापर करण्यास प्रतिबंध करेल का?*

*(क) भारतीय राज्यघटनेच्या कलम २२७ अंतर्गत दोषारोप निश्चित करण्याच्या आदेशावर आक्षेप घेता येईल का?"*

११. या मुद्द्यावरील कायद्यावर चर्चा केल्यानंतर खंडपीठाने पुढील निष्कर्ष काढला:

*(अ) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, **१९८८** अंतर्गत दोषारोप निश्चित करणारा आदेश हा एक अंतर्वादिक आदेश आहे.*

*(ब) कलम १९ (३) (सी) स्पष्टपणे अंतर्वादिक आदेशाच्या विरोधात पुनरिक्षण करण्यास प्रतिबंधित करते आणि दोषारोप निश्चित करणे ही एक अंतर्वादिक आदेश असल्याने पुनरिक्षण स्वीकारण्यायोग्य नाही.*

*(क) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत दाखल केलेली याचिका आणि भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२७ अंतर्गत प्राधान्य दिलेली रिट याचिका स्वीकारण्यायोग्य आहे.*

*(ड ) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत दाखल केलेली याचिका किंवा भारतीय संविधानाच्या कलम २२७ अंतर्गत दाखल केलेली रिट याचिका उच्च न्यायालयने कोणत्याही परिस्थितीत स्वीकारली असली तरी* 1988 *च्या कायद्यातील कलम १९ (३) (सी)*

*मधील मनाई लक्षात घेऊन स्थगिती आदेश पारित करणे आवश्यक आहे.*

*(ई) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अन्वये किंवा भारतीय राज्यघटनेच्या कलम २२७ अंतर्गत शक्तीचा वापर सिया राम सिंग* [(*१९७९*) *३ एससीसी ११८*], *विशेष कुमार* [*एआयआर १९८० एससी ८९२*], *खलील अहमद बशीर अहमद* [*एआयआर १९८८ एससी १८४*] *कमलनाथ आणि अन्य* [*एआयआर २००० एससी ११९७*] *रणजीत सिंग* [*एआयआर २००४ एससी ३८९२*] *आणि त्या क्षेत्रातील तत्सम निर्णयांनी घालून दिलेला कायदा लक्षात घेऊन संयमाने आणि अपवादात्मक परिस्थितीत वापरला जावा.*

(*फ*) *फौजदारी प्रक्रिया प्रस्थापित कायदा* (*नियम*) *४८२ अंतर्गत किंवा भारतीय राज्यघटनेच्या कलम २२७ अंतर्गत असलेल्या अधिकार क्षेत्र वापर छुप्या पद्धतीने अपील करण्यासाठी किंवा पुराव्याची पुन्हा दखल घेण्यासाठी केला जाऊ शकत नाही. वरील कार्यवाहीचा वापर अतिशय काळजीपूर्वक, सावधगिरी बाळगून आणि केवळ न्यायाचा गंभीर प्रमाद टाळण्यासाठी केला जावा.''*

१२. आरोप निश्चित करण्याचा आदेश अंतर्वादी आदेश होता आणि दंड प्रक्रिया संहिता कलम ३९७ (२) सह कलम ४०१ अंतर्गत पुनरावलोकन याचिका अशा आदेशाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागण्यास लागू केले जाणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.रिलायन्स मुख्यत्वे सीबीआयच्या ***माध्यमातून व्हीसी शुक्ला विरुद्ध राज्य या वादा वर आधारण्यात आले होते.*** विशेष न्यायालय कायदा १९७९ च्या कलम ११ ए चा अर्थ या न्यायालयाच्या चार न्यायाधीशांच्या खंडपीठाने लावला.खंडपीठाने एस. कुप्पुस्वामी राव विरुद्ध राजा या खटल्यात ही चाचणी लागू केली.सत्य नारायण शर्मा विरुद्ध राजस्थान राज्य या खटल्यातही रिलायन्सची बाजू मांडण्यात आली होती, ज्यामध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा ***१९८८*** च्या कलम *१९ (३) (सी)* चा विषय विचाराधीन होता.

१३. तथापि, कलम ३९७ किंवा दंड प्रक्रिया संहितेच्या इतर काही तरतुदींखाली प्रतिबंध असला तरीही दंड प्रक्रिया संहिता कलम ४८२ अंतर्गत याचिका उच्च न्यायालयात दाखल केली जाईल, असा निर्णय देण्यात आला.तथापि, जेव्हा न्यायालयाच्या प्रक्रियेचा दुरुपयोग होत असेल किंवा न्यायाच्या उद्दिष्टांसाठी हस्तक्षेप करणे आवश्यक असेल तेव्हाच अंगभूत शक्तीचा वापर केला जाऊ शकतो. ज्या ठिकाणी बेकायदेशीरपणे,

क्लेशदायक किंवा अधिकार क्षेत्र क्षेत्राबाहेरील कार्यवाही सुरू केली गेली असेल तेथे ते अतिशय संयमाने वापरणे आवश्यक आहे. कायद्याच्या स्पष्ट तरतुदींविरोधात या शक्तींचा वापर करता कामा नये. दुर्मिळ प्रकणामध्ये खटल्याच्या सुनावणीला स्थगिती देता येत नाही. या संदर्भात प्रामुख्याने सत्य नारायण शर्मा (उपरोक्त) आणि नवज्योत संधू (उपरोक्त) या न्यायालयाच्या निर्णयांवर विश्वास ठेवला गेला.

१४. घटनेच्या अनुच्छेद २२७ अंतर्गत या याचिकेच्या बाबत, (एल.चंद्रकुमार विरुद्ध भारत संघ आणि इतर) यांच्यात हि शक्ती संविधानाच्या मूलभूत संरचनेचा भाग आहे, असे मानले गेले आणि ती प्रतिबंधित केली जाऊ शकत नाही परंतु न्यायालय त्यावर आदेश देणे टाळेल कि जे भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्याच्या कलम १९ (३) (क) मध्ये समाविष्ट असलेल्या स्पष्ट हेतूच्या विरुद्ध असले आणि त्याला विरोध करू शकते. चंद्रशेखर सिंग आणि इतर विरुद्ध सियाराम सिंग आणि इतर मध्ये यावर भर देण्यात आला आहे.

१५. अपीलकर्त्यांच्या विद्वान वकिलांनी असे सादर केले की आरोप निश्चित करण्याचा आदेश हा अंतवर्ती आदेश होता असे मानण्यात उच्च न्यायालयाची चूक होती. कोणत्याही परिस्थितीत, कलम ४८२ फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत याचिका

असल्याने आणि घटनेच्या अनुच्छेद २२७ नुसार राखण्यायोग्य मानले गेले असल्याने, उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपास प्रतिबंध होऊ शकत नाही किंवा कलम १९, ३ (क)अनुसार मनाई असूनही स्थगिती देण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार असू शकत नाही. भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा - १९८८

१६. उलटपक्षी  केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या विद्वान वकिलांनी मात्र उच्च न्यायालयाच्या मताचे समर्थन केले .

१७.  आम्ही प्रतिस्पर्ध्यांच्या प्रस्तुतीचा योग्य विचार केला आहे आणि या न्यायालयाच्या निर्णयांचा अभ्यास केला आहे. जरी संदर्भित आरोप निश्चित करण्याचा प्रश्न हा  अंतरिम आदेश  आहे की नाही या मुद्द्याशी संबंधित असला तरी, हा  आरोप निश्चित करण्याच्या आदेशाच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी उच्च न्यायालयाने कोणता दृष्टिकोन स्वीकारावा याविषयी आम्ही पुढील प्रश्नावर विचार केला आहे. परिच्छेद १० मध्ये आधीच नमूद केल्याप्रमाणे, आक्षेपित आदेशाने या प्रश्नाचा देखील विचार केला. या प्रश्नावर पक्षकारांच्या विद्वान वकिलांनीही न्यायालयाला संबोधित केले आहे.

१८  वकिल मंडळाने  उद्धृत केलेल्या सर्व निर्णयांचा संदर्भ घेणे आवश्यक नाही.

असे म्हणणे पुरेसे आहे की मधु लिमये (तदैव) येथील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने असे सांगितले की कायदेमंडळाने, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या  कलम ३९७ च्या उपकलम 2 नुसार मध्यस्थी आदेशाविरूद्ध पुनरावृत्ती अधिकार क्षेत्राच्या विरोधात फौजदारी खटल्यांच्या कार्यवाहीच्या अंतिम निकालात विलंब रोखण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच वेळी, उच्च न्यायालयाचा अंतर्निहित अधिकार मर्यादित किंवा इतर कोणत्याही तरतुदीमुळे मर्यादित वा प्रभावित होत नाही. याचा अर्थ असा होऊ शकत नाही की पुनरावृत्ती शक्तीच्या वापरावर मर्यादा   घालणे आवश्यक आहे. अंतर्निहित शक्तीचा उपयोग न्याय मिळवून देण्यासाठी किंवा   न्यायालयीन प्रक्रियेचा दुरुपयोग रोखण्यासाठी केला जाऊ शकतो. ही शक्ती बेकायदेशीरपणे किंवा त्रासदायकपणे किंवा अधिकार क्षेत्राशिवाय सुरू केलेल्या कार्यवाहीविरूद्ध अत्यंत संयमाने वापरावी लागेल. याचिकेचे शिर्षक अवास्तव आहे. या न्यायालयाने (अमरनाथ विरुद्ध हरियाणा राज्य) मध्ये घेतलेला दृष्टिकोन सुधारित केला आणि (एस. कुप्पुस्वामी राव) (तदैव) मध्ये मांडलेल्या अंतर्वर्ती आदेशाच्या चाचणीपासून विचलित झाला. या संदर्भात आम्ही खालील निरीक्षणे उद्धृत करू इच्छितो:

*" ६.. या अपीलातील निर्धारासाठी येणारा मुद्दा या न्यायालयाच्या निर्णयाद्वारे पूर्णपणे समावेशित आहे, ज्याला आपल्यापैकी एक (उंटवालिया, जे.) (अमरनाथ विरुद्ध हरियाणा राज्य) यात पक्षकार होते*

परंतु या प्रकरणाचा बारकाईने विचार केल्यावर आणि या अपीलातील पक्षकारांच्या विद्वान वकिलांची सुनावणी केल्यावर, या न्यायालयाच्या दोन विद्वान न्यायाधीशांनी अमरनाथ प्रकरणात घेतलेल्या मताचे स्पष्टीकरण आणि पुनरुच्चार करणे आम्हाला उचित वाटले जे काहीसे सुधारित आणि बदलत्या स्वरूपात आहेत.

१०. अमर नाथ प्रकरणात नमूद केल्याप्रमाणे अपील, चौकशी, खटला किंवा इतर कार्यवाहीमध्ये पारित केलेल्या कोणत्याही अंतरवर्ती आदेशाच्या संदर्भात पुनरावृत्तीच्या अधिकारावर प्रतिबंध घालण्याचा हेतू, ह्या प्रकरणाचा जलद गतीने निपटारा करणे हा आहे. बहुतेकवेळा उच्च न्यायालयाच्या पुनरावृत्ती अधिकाराच्या अवलंब केला गेला होता, ज्यामुळे कार्यवाही अंतिम निकाली काढण्यास विलंब होत होता. कायदेमंडळाने आपल्या बुद्धिमत्तेने कलम ३९७मध्ये उपकलम (२) समावेश करून हा विलंब रोखण्याचा निर्णय घेतला. एका बाजूने उच्च न्यायालयाच्या मार्गात एक बार घातला गेला आहे (तसेच सत्र न्यायाधीश) कोणत्याही अंतवर्ती आदेशाच्या संदर्भात पुनरावृत्ती अधिकाराचा वापर करण्यासाठी, दुसऱ्या बाजूने, १८९८ च्या संहितेमध्ये समाविष्ट असलेल्या अटींमध्ये अधिकार प्रदान केले

गेले आहेत. कलम ४८२ च्या निव्वळ वाचनाने ह्याचे पालन होऊ शकते, आणि ह्यात कलम ३९७ चे उपकलम (२) देखील समाविष्ट असेल व उच्य न्यायालयाच्या अंतर्निहित अधिकारावर मर्यादा घालणारे मानले जाईल पण आपण जर असे म्हंटले कि हा प्रतिबंध अंतर्निहित शक्तीच्या वापरामध्ये कार्य करण्यासाठी अजिबात नाही, तो पुनरावृत्ती अधिकाराच्या वापरावर लादलेल्या मर्यादापैकी एक नाही. अशा परिस्थितीत सुसंवाद साधण्याचा मार्ग कोणता? आमच्या मते, या समस्येचे समाधानकारक समाधान असे म्हणायचे आहे की कलम ३९७ च्या उप-कलम (2) मध्ये प्रदान केलेला प्रतिबंध केवळ उच्च न्यायालयाच्या पुनरावृत्ती अधिकाराच्या संदर्भात वापरात येतो, उच्च न्यायालयाला कोणत्याही अंतवर्ती आदेशाच्या संदर्भात पुनरावृत्ती करण्याचे अधिकार नाहीत. नंतर वर नमूद केलेल्या तत्वांपैकी एका तत्वानुसार, पिडीत पक्षाच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी संहितेत कोणतीही अन्य तरतूद नसल्यामुळे अंतर्निहित शक्ती कार्यात येईल. परंतु, जर हा आदेश निव्वळ स्वरूपाचा असेल जो तर अंतवर्ती आदेश १८९८ च्या संहिते अंतर्गत उच्च न्यायालयाच्या पुनरावृत्ती अधिकाराचा वापर करून दुरुस्त केला जाऊ शकतो, परंतु तसे असल्यास न्यायालय आपला अंतर्निहित अधिकार वापरण्यास नकार

देईल. परंतु जर आक्षेपित आदेशामुळे न्यायालयाच्या प्रक्रियेचा गैरवापर होत असेल किंवा उच्च न्यायालयाचा न्याय्य हस्तक्षेप पूर्णत: आवश्यक असेल अशी परिस्थिती उद्भवली तर कलम ३९७ मध्ये समाविष्ट असलेली कोणतीही गोष्ट उच्च न्यायालयाच्या अंगभूत अधिकाराच्या वापरावर मर्यादा घालू शकत नाही किंवा प्रभावित करू शकत नाही. अशा प्रकारचा एक खटला म्हणजे बेकायदेशीर त्रासदायक किंवा अधिकार क्षेत्राबाहेरील फौजदारी कारवाई इष्टरित्या रद्द करणे ठरेल. उदाहरणादाखल एक केस घ्या जिथे हा खटला भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्याअंतर्गत मंजुरीशिवाय किंवा. मग आरोपीचा खटला चालवला जातो सुनावणी हि कार्यक्षेत्राशिवाय असेल आणि त्याची निर्दोष मुक्तता झाल्यानंतरही प्रागदोष सिद्धांतानुसार योग्य मंजुरी नंतर दुसरी चाचणी प्रतिबंधित केली जाणार नाही? उधारणादाखल असे नाही असे आपण म्हणू, की अशा प्रकरणात न्यायालयाने दखल घेणे किंवा प्रक्रिया सुरु करणे हा एक अंतरिम आदेश आहे असे म्हणण्याचे कारण आहे की उच्च न्यायालयाच्या अंगभूत अधिकाराचा वापर हा लवकरात लवकर फौजदारी कारवाई थांबवण्यासाठी केला न जाता आरोपीना शेवटपर्यंत त्रास देण्यासाठी होतो का ? उत्तर स्पष्ट आहे की न्यायालयाच्या प्रक्रियेचा दुरुपयोग

*रोखण्यासाठी आणि / किंवा न्यायाचा शेवट सुरक्षित करण्यासाठी हा प्रतिबंध चालणार नाही. पीडित पक्षाने दाखल केलेल्या याचिकेचे शिर्षक अवास्तव आहे. मा. उच्च न्यायालय आपल्या अंगभूत अधिकारांतर्गत योग्य तो तपास प्रकरणात करू शकते. सध्याचे प्रकरण निःसंशयपणे १९७३ संहितेच्या कलम ४८२ नुसार उच्च न्यायालयाच्या अधिकाराच्या वापरासाठी येते, असे जरी गृहीत धरले तरी, जरी स्वीकार्य नसले तरी, उच्च न्यायालयाच्या पुनरावृत्ती अधिकाराचा वापर करण्यास परवानगी नाही, असे आवाहन करत आहे.*

*१३. परंतु आपल्या निर्णयात अशी व्याख्या केली आणि सार्वत्रिक वापर या तत्वानुसार, अंतिम आदेश नव्हे तर अंतवर्ती आदेश असणे आवश्यक नाही वा न्याय्यही नाही.जर तसे असेल तर ते कलम ३९७ (१) द्वारे सत्र न्यायालय किंवा उच्च न्यायालयाने प्रदान केलेले पुनरावृत्ती अधिकार हे जवळजवळ नगण्य ठरतील अशा टीकेवर, केवळ तेच आदेश सुधारित केले जातील जे कारवाईच्या अंतिम निर्धारावर दिलेले आदेश आहेत परंतु संहितेच्या XXIX अध्याय अंतर्गत अपील करण्यायोग्य नाहीत. १८९८ च्या संहितेप्रमाणेच उच्च न्यायालयाची पुनरावृत्ती अधिकार कायम ठेवताना कायदेमंडळाचा हा हेतू दिसत*

*नाही. मग कोणत्या प्रकरणांमध्ये उच्च न्यायालय एखाद्या आदेशाची वैधता किंवा औचित्य किंवा कनिष्ठ फौजदारी न्यायालयाच्या कोणत्याही कार्यवाहीची वैधता तपासेल?अंतिम निर्धारानंतर तपासणीसाठी आणलेल्या आणि ज्यामध्ये कोणतेही अपील नाही अशाच कार्यवाहीचे परीक्षण करणे बंधनकारक आहे का? अशी प्रकरणे फारच कमी असतील......*

*कप्पूस्वामी खटल्यात अंतर्भूत असलेल्या अर्थाने अंतिम निर्णय नसेल असा आदेश कार्यवाही दरम्यान दिला जाऊ शकतो,परंतु, तरीही तो एक शुद्ध व साधा अंतवर्ती आदेश असू शकत नाही. काही प्रकरणे या दोन्हि प्रकारात येऊ शकतात, आम्हाला वाटते की कलम ३९७ च्या उप-कलम (2) मधील (बारचा) अर्थ अशा प्रकारच्या मध्यवर्ती आदेशांकडे आकर्षित करण्यासाठी नाही..."*

१९. (मोहनलाल मगनलाल ठाकर विरुद्ध गुजरात राज्य) मधील निकालाचा संदर्भ देताना, असे मानले गेले की त्यामध्ये स्वीकारण्यात आलेली चाचणी अशी होती की जर चुकीचा आदेश उलटून गेल्यास कार्यवाही पूर्ण झाली, तर असा आदेश अंतवर्ती नसून अंतिम आदेश असू शकतो. त्याचे निरीक्षण करण्यात आले ते पुढील प्रमाणे -

*“१५.....बहुमताच्या निर्णयात काही इंग्रजी निर्णयांमधून चार चाचण्या वगळण्यात आल्या. ते पान नंबर ६८८ वर गणले गेलेले आढळले. चाचणीपैकी एक म्हणजे "प्रश्नातील क्रम मागे पुढे झाल्यास कारवाई सुरूच ठेवावी लागेल का?" ही चाचणी तात्काळ खटल्यातील तथ्यांवर लागू केल्यास असे लक्षात येईल की जर अपीलकर्त्याची याचिका यशस्वी झाली आणि सत्र न्यायाधीशांचा आदेश उलटला, तर त्याच्याविरुद्ध सुरू केलेली आणि प्रस्थापित झालेली फौजदारी कारवाई पुढे चालू ठेवू शकत नाही. तथापि, जर तो प्राथमिक मुद्द्याच्या गुणवत्तेवर अपयशी ठरला तर कार्यवाही चालू राहील. कुप्पुस्वामी प्रकरणात असलेली संपरिक्षा चाचणी लागू करणे हा अंतिम आदेश असणार नाही. पण चौथी चाचणी लागू करताना (पी. मोहनलाल) प्रकरणात (६८८ नंबर पान) हा अंतिम आदेश असेल. फरकाचा खरा मुद्दा मात्र पान नंबर ६९३ वर सापडतो. न्याय मूर्ती शेलाट, यांच्या निकालात हा उतारा असा आहे :*

*(“रमेश वि. गेंदालाल मोतीलाल पटनी) [(१९६६)३ एस सी आर १९९८: एआयआर १९६६ एस सी १४४५] मध्ये निरिक्षण केल्याप्रमाणे त्या आदेशाचा संबंध तक्रारीतील विवादाशी जोडून त्याआदेशाची अंतिमत:*

*ठरवली जाणार नव्हती. आरोपित असलेला गुन्हा केला होता कि नाही हा वाद कायम असून, तो असंबंध आहे."*

२०. मधू लिमये (तदैव) मधील तत्त्वे अजूनही कायम आहेत आणि (व्ही. सी. शुक्ला विरुद्ध राज्य सरकारतर्फे सीबीआय) तीन न्यायाधीशांच्या निर्णयामुळे किंवा अलीकडेच गिरीश कुमार सुनेजा विरुद्ध केंद्रीय अन्वेषण ब्यूरो मधील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाच्या निर्णयामुळे त्यांचे महत्व कमी झालेले नाहीत. **व्ही. सी. 20 शुक्ला (**तदैव**) खटल्यात आरोप निश्चित करण्याचा आदेश अंतर्वर्ती आदेश म्हणून मान्य करण्यात आला असला, तरी मधू लिमये (**तदैव**) खटल्यात प्रतिकूल न्यायनिर्णय देताना त्यात विचारात घेतलेल्या कायद्याच्या संदर्भात वेगळा न्यायनिर्णय देण्यात आला.**एस. कुप्पुस्वामी राव (उपरोक्त) यातील अंतर्भूत असलेल्या मताला मोहनलाल मगनलाल ठाकर (उपरोक्त) यात मान्यता दिली आहे मात्र तथ्यात्मक दृष्ट्या मधू लिमये (वरील) यात त्यांचे वेगळे स्पष्टीकरण दिले आहे, जसे आधी नमूद केले आहे. अशा प्रकारे, व्ही. सी. शुक्ला (वरील) हे चार न्यायाधीशांच्या खंडपीठाचा न्यायनिर्णय असूनही, मधू लिमये (वरील) तत्वाने हे क्षेत्र राखले नाही असे म्हणता येणार नाही. तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने गिरीश कुमार सुनेजा यांच्या (उपरोक्त) संदर्भात विचारणा केली होती की, मनोहरलाल शर्मा विरुद्ध मुख्य सचिव व इतर [कोळसा खाणवाटपाची प्रकरणे] या प्रकरणात

न्यायालयाशिवाय इतर कोणतेही न्यायालय तपास/खटल्याला स्थगिती देणार नाही असे निर्देश देणाऱ्या या न्यायालयाच्या आदेशाने आरोप निश्चित करण्याच्या आदेशाविरुद्ध प्रभावित होवून पक्षांच्या अधिकाराचे उल्लंघन केले. असे निदर्शनास आले की आरोप निश्चित करण्याचा आदेश हा अंतवर्ती आदेश असल्याने, कलम ३९७ (२) किंवा कलम ४८२ फौजदारी प्रक्रिया संहिता १९ अन्वये त्यात हस्तक्षेप केला जाऊ शकत नाही, तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा प्रकरणांमध्येही कार्यवाहीला स्थगिती दिली जाऊ शकत नाही असे लक्षात आले. कलम ४८२ फौजदारी प्रक्रिया संहिता २० अन्वये पुढे असे निदर्शनास आले की कलम २२७ अंतर्गत अधिकार अत्यंत व्याप्त असले तरी (शालिनी श्याम शेट्टी विरुद्ध राजेंद्र शंकर पाटील) मध्ये सरसकट त्याचा वापर केला जाऊ शकत नाही.

> *"३७... न्यायिक हस्तक्षेपाची ही राखीव आणि अपवादात्मक शक्ती केवळ वैयक्तिक प्रकरणांमध्ये दिलासा देण्यासाठी वापरली जाणार नाही तर मोठ्या सार्वजनिक हितासाठी न्याय प्रशासनावर जनतेचा विश्वास वाढवण्यासाठी निर्देशित केले पाहिजे, तर घटनेचे कलम २२६ संरक्षणासाठी आहे. संविधान हे वैयक्तिक तक्रारींचे संरक्षण करण्यासाठी आहे. त्यामुळे,अनुच्छेद २२७अंतर्गत शक्ती अखंड असू शकते परंतु त्याचा वापर वर नमूद केलेल्या उच्च न्यायालयीन शिस्तीच्या अधीन आहे."*

२१. हे निदर्शनास आले की फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत अधिकार केवळ दुर्मिळ प्रकरणांमध्ये वापरले जाऊ शकतात, अन्यथा नाही.

*३८. फौजदारी प्रक्रिया संहिता ही स्वतःतच एक संपूर्ण संहिता आहे. आमच्याद्वारे आधीच चर्चा केल्याप्रमाणे, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३९७(२)अंतर्गत विवेकाधीन अधिकार क्षेत्राचा वापर केवळ अंतिम संदर्भात केला जातो. आदेश आणि अंतरीम आदेश.फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत असलेल्या अधिकाराचा वापर केवळ फौजदारी प्रक्रिया संहितेअंतर्गत पारित झालेले आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा कोणत्याही न्यायालयाच्या आदेशाचा गैरवापर रोखण्यासाठी किंवा अंतिम न्यायाचा उद्देश साध्य करण्यासाठी केला जाऊ शकतो. वर नमूद केल्याप्रमाणे, या अधिकाराचा वापर केवळ दुर्मिळातील दुर्मिळ प्रकरणांमध्ये केला पाहिजे, अन्यथा नाही.जर ही स्थिती असेल आणि आम्ही असे मानतो, की राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ आणि २२७ चा अवलंब करणे कदाचित केवळ सर्वात असामान्य प्रकरणातच स्वीकार्य असेल.जेव्हा फौजदारी प्रक्रिया संहिता आरोपी व्यक्तीच्या फायद्यासाठी निष्पक्ष आणि जलद सुनावणीच्या हितसंबंधात उच्च न्यायालय घटनात्मक*

*अधिकार क्षेत्राचा वापर करते, तेव्हा आरोपी व्यक्तीला घटनेच्या कलम २२६ आणि २२७ उपलब्ध असल्यामुळे, या तरतुदींचा वापर दुर्मिळ नाही तर क्षुल्लक मुद्द्यांसाठी केला जावा हा प्रस्ताव स्वीकारणे आम्हाला कठीण वाटते.*

२२. (करतार सिंग विरुद्ध पंजाब राज्य) मध्ये सात न्यायाधीशांच्या खंडपीठाच्या निर्णयावर भर दिला होता त्याची मांडणी खालीलप्रमाणे –

*"४०....जर उच्च न्यायालये कलम २२६ अंतर्गत त्यांच्या असाधारण अधिकार क्षेत्र क्षेत्राचा वापर करून जामिनासाठी अर्ज स्वीकारत असतील आणि तसे आदेश पारित करत असतील तर त्यांचा उद्देश आणि संसदेचा हेत पूर्णपणे पराभूत आणि उदासीन होईल. मात्र त्याचवेळी उच्च न्यायालयांना यांचे अयशस्वी अधिकार क्षेत्र नाही असे म्हणता येणार नाही. म्हणूनच, या न्यायालयाने अब्दुल हमीद हाजी मोहम्मद [(११९४)२) एससीसी ६६४] मध्ये घेतलेल्या मताशी आम्ही पूर्णपणे सहमत आहोत की जर उच्च न्यायालय कलम २२६ अंतर्गत कोणत्याही अर्जाची दखल घेत असेल, तर अधिकाराचा वापर अत्यंत दुर्मिळ आणि योग्य परिस्थितीत अत्यंत प्र प्रमाणबद्ध व्हावा ही दुर्मिळ*

*प्रकरणे कोणती आहेत आणि कलम २२६ अंतर्गत अर्जांची दखल घेणे योग्य ठरेल अशी परिस्थिती कोणती असेल हे सहजासहजी मान्य करता येणार नाही."*

२३. कलम १९ (३) क मधील अडथळा लक्षात घेता भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्याच्या प्रकरणांमध्ये स्थगिती दिली जाऊ शकत नाही असे निरीक्षण नोंदवण्यात आले.

"६४. भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्याच्या कलम १९ (३) चे वाचन असे सूचित करते की ते तीन परिस्थितींशी संबंधित आहेः(अ) विशेष न्यायाधीशांनी अंतिम न्यायनिर्णय आणि शिक्षा दिल्याची परिस्थिती आहे.आम्हाला या परिस्थितीची चिंता नाही.कलम (2) खंड (ब) हा संबंधित प्राधिकरणाकडून आरोपी व्यक्तीवर खटला चालवण्यासाठी मंजुरी देण्यात कोणतीही चूक, अकृती (वगळणे) अनियमितता झाल्यास भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत कार्यवाहीला स्थगिती देण्याबाबत संबंधित आहे. यामध्ये हे स्पष्ट करण्यात आले आहे की, चूक किंवा अनियमिततेमुळे न्यायाला अपयश आले आहे असे न्यायालयाचे समाधान झाल्याशिवाय कोणतेही न्यायालय अशा कारणास्तव कारवाईला स्थगिती देऊ शकत नाही-तेव्हाच आणि तेव्हाच न्यायालय

भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यांतर्गत कारवाईला स्थगिती देऊ शकते. या कायद्यात असे म्हटले आहे कि, स्थगिती की कोणत्याही न्यायालयाला " मंजुरीतील त्रुटी, चूक किंवा अनियमिततेशी संबंधित कारण असल्यास इतर कोणत्याही कारणास्तव स्थगिती देऊ शकत नाही. कलम १९ (३) च्या कलम (ब) आणि कलम (सी) चे संयुक्तपणे वाचन केल्यास हे स्पष्ट होते कि, कार्यवाहीला स्थगिती केवळ आणि केवळ तेव्हाच दिली जाऊ शकते जेव्हा अभियोजनासाठी असेल आणि हे दोन कारणे सोडून इतर कारणांव्यतिरिक्त केल्यास न्याय हा अपयशी ठरू शकतो.

६५. *भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम च्या कलम 19 (3) च्या खंड (ख) आणि खंड (ग) चे संयुक्तपणे वाचन केल्यास हे स्पष्ट होते की अभियोगासाठी आवश्यक असलेल्या मंजुरीमध्ये चूक, वगळणूक किंवा अनियमितता असेल आणि त्या चूक, वगळणूक किंवा अनियमिततेमुळे न्याय निष्फळ झाला असेल तरच कार्यवाहीला स्थगिती दिली जाऊ शकते. इतर कोणतेही कारण भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम अन्वये कार्यवाहीला स्थगिती देण्याबाबत दिलेले नाही मग भलेही न्याय निष्फळ होत असेल. खंड (ग ) कुठल्याही संपरीक्षेदरम्यान दिलेल्या अंतरिम आदेशासंदर्भात पुनरिक्षण न्यायाधिकारक्षेत्राचा वापर करण्यास प्रतिबंध करतो ज्याचा संदर्भ आम्ही आधीच दिला आहे. आमच्या*

*मते, भ्रष्टाचार प्रतिबंध  कायद्याच्या कलम 19 (3) च्या खंड (ख) आणि (ग) च्या तरतुदी एकत्रितपणे वाचता अगदी स्पष्ट आहेत आणि कोणतीही अस्पष्टता किंवा अधिक व्याख्या करण्याची आवश्यकता मान्य करत नाहीत."*

२४. आपण उच्च न्यायालयाच्या अंगभूत अधिकारांच्या स्वरूपाबद्दल रतिलाल भानजी मिठानी विरुद्ध असिस्टंट कलेक्टर ऑफ कस्टम्स, मुंबई आणि इतर २३ मधील घटनापीठाच्या निरिक्षणांचा संदर्भ देखील घेऊ शकतो :

*"फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५६१-अ  द्वारे संरक्षित केलेले उच्च न्यायालयाचे अंतर्निहित अधिकार  संविधानाच्या  कलम २१ मधील "कायदा " अभिव्यक्तीच्या अर्थानुसार समाविष्ट आहेत. अंतर्निहित अधिकारांचा वापर करण्याची पद्धती उच्च न्यायालयाने तयार केलेल्या नियमांद्वारे नियमित केली जाते. असे नियम बनवण्याचे अधिकार राज्यघटनेने उच्च न्यायालयाला दिले आहेत. यापूर्वी  अंमलात असलेले नियम संविधानाच्या कलम ३७२ द्वारे अंमलात होते."*

२५. आक्षेपित न्यायनिर्णयात योग्यपणे नमूद केल्याप्रमाणे, वरील एल. चंद्रकुमार प्रकरणात सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने कलम २२७ अंतर्गत अधिकार क्षेत्राचा

वापर करण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार हा संविधानाच्या मूलभूत संरचनेचाच एक भाग आहे असा न्यायनिर्णय दिला.

२६. अशा प्रकारे, जरी विविध परिस्थितीमध्ये प्रकरणे हाताळताना, आरोप निश्चित करणारा आदेश आंतर्वादिक आदेश होता आणि तो कलम ३९७(२) किंवा फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत देखील हस्तक्षेप करता येणार नाही असे निर्धारित करताना परस्परविरोधी वाटणारी निरीक्षणे केली गेली असतील, तरीही वरील मधू लिमये मधील तत्व अजूनही टिकून आहे. आरोप निश्चित करणाऱ्या आदेशाला केवळ 'आंतर्वादिक आदेश' ( इंटरलॉक्यूटरी ऑर्डर ) जरी म्हणता येणार नसेल आणि त्यात प्राप्त परिस्थितीत फौ. व्यं. सं. कलम ३९७ (२) किंवा ४८२ किंवा राज्यघटनेच्या कलम २२७ अन्वये, जी की घटनात्मक तरतूद आहे, हस्तक्षेप उच्च न्यायालयाला अतिशय अपवादात्मक परिस्तिथीच करता येईल .

२७. त्यामुळे आम्ही निःसंकोचपणे असा निष्कर्ष काढतो की, उच्च न्यायालयाला योग्य त्या प्रकरणात दोषारोपनिश्चितीच्या आदेशाला आव्हान देण्याची व स्थगिती आदेश देण्याची शक्ती आहे, परंतु अशा शक्तिंचा वापर कसा करायचा आणि स्थगिती कधी दिली जावी यावर आणखी विचार करणे आवश्यक आहे.

२८. भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्याच्या प्रकरणांमधील गिरीश कुमार सुनेजा (पूर्वोक्त) या खटल्यामध्ये निरीक्षण नोंदवल्याप्रमाणे, विधीमंडळाचा हेतू कार्यवाहीच्या स्थगितीद्वारे आणलेल्या कोणत्याही अडथळ्याशिवाय दैनंदिन आधारावर खटला जलद गतीने पूर्ण करणे हा आहे आणि या दृष्टिकोनाचा (काळजीचा) आदर केला गेला पाहिजे. या न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३९७(१) व भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याचे परंतुक २२(घ ) मधील तरतुदींची नोंद घेतली आहे की पुनरीक्षण न्यायालय सामान्यतः कार्यवाहीचा अभिलेख मागवणार नाही. जर अभिलेख मागवण्यात आले, तर विशेष न्यायाधीश खटला पुढे चालू ठेवू शकणार नाहीत व त्यात अप्रत्यक्षपणे स्थगिती मिळेल. समाजाच्या हिताच्या सोबत आरोपींचे अधिकार सुद्धा विचारात घेतले पाहिजे. आधीच नमूद केल्याप्रमाणे, कर्तार सिंग (पूर्वोक्त) मधील प्रकरणात सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने असे अभिनिर्णित केले आहे की, अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाने घटनात्मक शक्तिंचा वापर न्यायालयीन चौकटीत राहून परिस्थितीनुसार आणि प्रस्थापित तत्त्वांनुसार काळजीपूर्वक केला पाहिजे. दुर्मिळ आणि अत्यंत टोकाच्या परिस्थितीतच या शक्तीचा वापर केला पाहिजे.

२९. हे सर्वमान्य आहे की, फौजदारी खटल्यातील विलंब, विशेषत: भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्याच्या प्रकरणांमधील विलंबाचा, न्याय प्रशासनावर ज्यामध्ये समाजाचे हित आहे घातक परिणाम होतो. संपरीक्षणास विलंब विधी नियमावरील विश्वास आणि कायदेशीर व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर दुष्परिणाम करतो. याचा परिणाम समाज कल्याण आणि

विकासावर होतो. दिवाणी किंवा कर प्रकरणांमध्येही स्थगिती मंजूर करण्याच्या अधिकाराचा वापर संयमाने केला पाहिजे असे नमूद केले आहे. केवळ सकृत दर्शनी खटला पुरेसा नाही. स्थगिती मागणाऱ्या पक्षाने अटी पाळल्या पाहिजेत आणि स्थगिती हे विलंबासाठी प्रोत्साहन नसावे. स्थगिती देणाऱ्या आदेशामध्ये बुद्धीचा योग्य उपयोग दिसला पाहिजे. स्थगितीस मंजूरी देण्याची शक्ती ही उत्तरदायित्वासह २४ आहे.

३०. जिथे जिथे स्थगिती दिली जाते तिथे, हा खटला अपवादात्मक स्वरूपाचा होता आणि स्थगितीमुळे विलंब झाल्यास भ्रष्टाचाराच्या खटल्यातील जलद खटल्याच्या हिताला बाधा येणार नाही असे दर्शविणारा सकारण आदेश (स्पीकिंग ऑर्डर) पारित करणे आवश्यक आहे. एकदा स्थगिती दिल्यानंतर, कार्यवाही तहकूब करून दोन-तीन महिन्यांत पूर्ण करू नये.

24.(सिलीगुडी महानगरपालिका विरुद्ध अमलेंदु दास (१९८४) २ एससीसी ४३६, पॅरा ४ असिस्टंट कलेक्टर ऑफ सेन्ट्रल एक्साइज, चंदन नगर, पश्चिम बंगाल विरुद्ध डनलप इंडिया लिमिटेड आणि इतर (१९८५) १ एससीसी २६०, पॅरा ५; केंद्रशासित प्रदेश पाँडिचेरी आणि इतर विरुद्ध. पी. व्ही. सुरेश आणि इतर (१९९४) २ एससीसी ७०, पॅरा १५ आणि पश्चिम बंगाल राज्य विरुद्ध कोलकाता हार्डवेअर स्टोर्स आणि इतर (१९८६) २ एससीसी २०३, पॅरा ५)

३१. विधिमंडळाचे शहाणपण आणि फौजदारी कार्यवाहीचा अंतिम आणि जलद निपटारा करण्याच्या उद्देशाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. उच्च न्यायालयाला आपल्या अधिकारांचा वापर करून एका बाजूला व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि दुसरीकडे समाजाची सुरक्षा यांचा समतोल राखावयाचा आहे. अगदीच अवैधता किंवा अधिकार क्षेत्राचा अभाव असल्यास त्या प्रकरणातच उच्च न्यायालय आपल्या अधिकार क्षेत्राचा वापर करू शकते. सर्वमान्य अनुभव असा आहे की, जेथे आरोप निश्चित करण्याच्या आदेशाला आव्हान दिले जाते, तेंव्हा ते प्रकरण दीर्घकाळ प्रलंबित राहते, व न्यायाला अहितकारक ठरते.

३२. वरील परिच्छेद ९ मधील आधीच्या निकालांमध्ये आम्ही नमूद केलेला न्यायालयीन अनुभव आधीच उद्‌धृत केला आहे की उच्च न्यायालयांसमोर दोषारोपाच्या आदेशाला आव्हान दिल्याने भ्रष्टाचाराच्या खटल्यांची सुनावणी पुढे चालू ठेवता येणार नाही. प्रकरणास एकदा स्थगिती मंजूर झाली की, उच्च न्यायालयासमोरील याचिका निकाली काढण्यास बराच कालावधी लागतो. आरोप निश्चित करण्याच्या आदेशाविरुद्ध आव्हान विचारात घेताना मोठ्या प्रमाणावर असलेल्या सामग्रीची बारकाईने तपासणी करण्याची आवश्यकता नाही, जी एक लघु संपरीक्षाच (मिनी ट्रायल) ठरू शकते. दोषारोप निश्चिती वेळी आरोपीला गुन्ह्याशी यथार्थपणे जोडणारी कागदपत्रे अभिलेखावर आहेत की नाही, एवढेच न्यायालयाला पाहावयाचे आहे, या बाबत कायदा सुनिश्चित असला तरी, अशी संपरीक्षा करण्याची वेळ न्यायालयावर येते. या न्यायालयाच्या घटनापीठाने हरदीपसिंग विरुद्ध पंजाब

राज्य25 खटल्यात असे निरीक्षण केले आहे की :

> *१००. तथापि, अशा अनेक प्रकरणांची मालिका आहे ज्यामध्ये या न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २२७, २२८, २३९, २४०, २४१, २४२ आणि २४५ च्या तरतुदींचा विचार करताना सातत्याने असे म्हटले आहे की आरोप निश्चित करण्याच्या टप्प्यावर न्यायालयाने आपल्या बुद्धीचा उपयोग करून आरोपीने गुन्हा केल्याचे गृहीत धरण्याचे कोणतेही कारण आहे की नाही या प्रश्नावर विचार केला पाहिजे. अभिलेखावर आणलेली सामग्री आरोपींना गुन्ह्याशी यथार्थपणे जोडते का, हे न्यायालयाला पाहावे लागेल. याहून अधिक चौकशी करण्याची गरज नाही. उपरोक्त तरतुदी हाताळताना, 'सकृतदर्शनी प्रकरणाची' चाचणी घ्यावी लागेल. अभियोजन पक्षाने पुरावा म्हणून जोडण्यासाठी सादर केलेली सामग्री आरोपींविरुद्ध पुढील कार्यवाही करण्यासाठी पुरेशी आहे का हे न्यायालयाला शोधून काढावे लागेल, ( पाहा: कर्नाटक राज्य विरुद्ध एल. मुनिस्वामी [(१९७७) २ एससीसी ६९९ ], ऑल इंडिया बँक ऑफिसर्स कन्फेडरेशन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया [(१९८९) ४ एससीसी ९० ] स्त्री अत्याचार विरोधी परिषद विरुद्ध दिलीप नथुमल चोर्डिया [(१९८९) १ एससीसी ७१५ ] मध्य प्रदेश राज्य विरुद्ध कृष्णचंद्र सक्सेना [(१९६६) ११ एससीसी ४३९] आणि मध्य प्रदेश राज्य विरुद्ध मोहनलाल सोनी [(२०००) ६ एससीसी ३८८]-*

*१०१. दिलावर बालू कुरणे विरुद्ध महाराष्ट्र राज्य [(२००२) २ एससीसी १३५ ] या प्रकरणात,फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २२७, आणि २२८, च्या तरतुदींचा विचार करताना,या न्यायालयाने भारत सरकार विरुद्ध प्रफुल्ल कुमार सामल [(१९७९) ३ एससीसी ४] मधील या न्यायालयाच्या पूर्वीच्या न्यायनिर्णयावर खूप जास्त भर दिला आणि आरोप निश्चित करण्याच्या प्रश्नाचा विचार करताना, हा निर्णय दिला की, आरोपींविरुद्ध सकृतदर्शनी गुन्हा दाखल झाला आहे की नाही आणि न्यायालयासमोर सादर केलेल्या सामग्रीतून आरोपींविरुद्ध घोर संशय व्यक्त होतो की नाही, जे कि योग्यरित्या स्पष्ट केले गेले नाही, हे शोधण्याच्या मर्यादित उद्देशाने न्यायालय पुराव्यांचे मूल्यमापन करू शकते. अशा परिस्थितीत, न्यायालयाने आरोप निश्चित करणे आणि खटला चालवणे समर्थनीय आहे. न्यायालयाला या प्रकरणाची विस्तृत संभाव्यता, पुराव्यांचा एकूण परिणाम आणि न्यायालयासमोर सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार करावा लागेल परंतु न्यायालयाने या प्रकरणाच्या साधक-बाधक गोष्टींची चौकशी करू नये आणि खटला चालवत असल्यासारखे पुराव्यांचे मूल्यमापन करू नये.*

*१०२. सुरेश विरुद्ध महाराष्ट्र राज्य [(२००१) ३ एससीसी ७०३] या खटल्यात निरंजन सिंग करम सिंग पंजाबी विरुद्ध जितेंद्र भीमराज बिजय [(१९९०) ४*

*एससीसी ७६] आणि महाराष्ट्र राज्य विरुद्ध प्रिया शरण महाराज [(१९९७) ४ एससीसी ३९३] मधील पूर्वीच्या निकालांची दखल घेतल्यानंतर या न्यायालयाने खालील प्रमाणे निर्णय दिलाः (सुरेश प्रकरण, एससीसी पृष्ठ ७०७, परिच्छेद ९)*

> *"९. ...कलम २२७ आणि २२८ च्या टप्प्यावर न्यायालयाला अभिलेखावरील सामग्री आणि कागदपत्रांचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे जेणेकरून त्यांच्या दर्शनी मूल्यानुसार त्यातून बाहेर येणाऱ्या तथ्यातून कथित गुन्ह्यात समाविष्ट असलेल्या सर्व घटकांचे अस्तित्व उघड होतील. या मर्यादित उद्देशासाठी, न्यायालय पुराव्यांची चाळणी करू शकते, कारण त्या प्रारंभिक टप्प्यावर अभियोजन पक्षाने जे काही सुवार्ता सत्य (गॉस्पेल ट्रुथ) म्हणून सांगितले आहे ते स्वीकारण्याची अपेक्षा केली जाऊ शकत नाही, जरी ते सामान्य ज्ञानाच्या किंवा प्रकरणाच्या विस्तृत संभाव्यतेच्या विरोधात असले तरीही. म्हणूनच, आरोप निश्चित करण्याच्या टप्प्यावर, आरोपीने गुन्हा केला आहे ** किंवा त्याच्या विरोधात कारवाई करण्यासाठी पुरेसा आधार नाही ** असे गृहीत धरून** किंवा निष्कर्षावर पोहोचण्याच्या उद्देशाने ** दोषी ठरवण्याची शक्यता नाही * हे शोधण्यासाठी सामग्रीचा विचार करावा लागेल . (प्रिया शरण प्रकरण, एससीसी पृष्ठ 397, परिच्छेद 8)"*

(मूळ मजकुरावर भर)

*१०३. त्याचप्रमाणे, बिहार राज्य विरुद्ध रमेश सिंग [(१९७७ ) ४ एससीसी ३९ ] या प्रकरणामध्ये सामोरे जाताना या न्यायालयाने निर्णय दिला की : (एससीसी पान ४१ , परिच्छेद ४ )*

> *"४. ... आरोपीचा अपराध सिद्ध करण्यासाठी अभियोगाने जो पुरावा जोडण्याचा प्रस्ताव मांडला असेल तो उलटतपासणीत आव्हान देण्यापूर्वी पूर्णपणे स्वीकारला गेला असेल किंवा बचाव पक्षाने पुराव्याद्वारे खंडन केले असेल, जर केले असेल तर, व आरोपीने गुन्हा केल्याचे सिद्ध करू शकला नाही, तर संपरीक्षा सुरू ठेवण्यासाठी पुरेसा आधार असणार नाही."*

३३. जर वरील कायद्याच्या विरोधात, आरोपनिश्चितीच्या टप्प्यावर, उच्च न्यायालय शक्यतांचे मूल्यमापन आणि सामग्रींचा पुनर्विचार करत असेल, तर तो निश्चितच वेळ घेणारा प्रयत्न असू शकतो. त्यामुळे खटल्याचा अंतिम निर्णय जलदगतीने करण्याच्या वैधानिक धोरणाला बाधा येते. म्हणूनच, या मताचा पुनरुच्चार करताना, अधिकारक्षेत्राच्या अभावांची त्रुटी दुरुस्त करण्यासाठी अपवादात्मक परिस्थितीत आरोप निश्चित करण्याच्या आदेशाविरुद्धचे आव्हान विचारात घेण्यास उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात कोणताही अडथळा नाही, अशा अधिकार क्षेत्राचा वापर दुर्मिळात दुर्मिळ प्रकरणांपुरताच मर्यादित असला पाहिजे. आरोप निश्चित करण्याच्या आदेशाला आव्हान दिल्यानंतरही अशा याचिकेवर निर्णय घेण्यास विलंब

होता कामा नये. कोणतीही अनिवार्य कालमर्यादा निश्चित केली जाऊ शकत नसली तरी साधारणपणे ती दोन-तीन महिन्यांपेक्षा जास्त नसावी. जर स्थगिती दिली गेली तर ती सामान्यतः बिनशर्त किंवा अनिश्चित काळाची नसावी. ज्या पक्षाच्या बाजूने स्थगिती मंजूर करण्यात आली असेल, त्या पक्षाला उत्तरदायी ठरवण्यासाठी योग्य त्या अटी लादल्या जाऊ शकतात, जर या प्रकरणाच्या अखेरीस न्यायालयाला काही गुणवत्ता आढळली नसेल आणि दुसऱ्या पक्षाला नुकसान आणि अन्याय सहन करावा लागला असेल तर. फौजदारी प्रकरणांमध्ये जलद न्याय मिळण्यासाठी वैधानिक धोरण आणि कलम २१ च्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी, जर स्थगिती दिली गेली असेल तर हे प्रकरण कार्यवाहीसाठी दैनंदिन आधारावर घेतले पाहिजे आणि दोन-तीन महिन्यात निकाली काढण्यात यावे. प्रकरण अधिक काळ प्रलंबित राहिल्यास, खटल्याच्या अंतिम निकालासाठी संपरीक्षा न्यायालयद्वारे खटल्याच्या अंतिम निकालासाठी स्थगिती देण्यास प्राधान्य द्यायचे असेल अशी असाधारण परिस्थिती दर्शवणाऱ्या सकारण आदेशाद्वारे (स्पीकिंग ऑर्डरद्वारे) मुदतवाढ दिल्याशिवाय, स्थगितीचा आदेश सहा महिन्यांच्या कालावधीनंतर रद्द केला जाईल. साधारणपणे एक ते दोन वर्षात अशा प्रकारच्या संपरीक्षा पूर्ण होण्याची अपेक्षा असल्यामुळे ही कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

**३४. इम्तियाज अहमद विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य२६ या खटल्यात या न्यायालयाने एका अहवालाचा विचार केल्यानंतर नमूद केलेः**

"(क) स्थगिती आदेशाच्या तारखेपासून तब्बल 9% प्रकरणे वीस वर्षांपेक्षा जास्त कालावधीत पूर्ण झाली आहेत.

(ख) अंदाजे २१% प्रकरणांनी दहा वर्षांपेक्षा जास्त कालावधी पूर्ण केला आहे.

(ग) प्रलंबित प्रकरणांची सरासरी संख्या (स्थगिती आदेश तारखेपासून ते 26-7-2010 पर्यंत मोजण्यात आली आहे) सुमारे 7.4 वर्षे आहे.

(घ) *आरोपपत्र हा सर्वात प्रमुख टप्पा असल्याचे आढळून आले जेथे या श्रेणीतील* सुमारे 32% प्रकरणे स्थगित करण्यात आली होती. पुढील दोन प्रमुख टप्पे 'हजेरी' आणि 'समन्स' असे आढळले आहेत, ज्यात प्रत्येकी एकूण प्रकरणांच्या १९ % प्रकरणांचा समावेश आहे. जर 'हजेरी' आणि 'समन्स' परस्पर बदलण्यायोग्य मानले गेले, तर ते एकत्रितपणे जास्तीत जास्त स्थगिती आदेशासाठी जबाबदार असतील.

वरील परिस्थितीची दखल घेतल्यानंतर न्यायालयाने पुढील निर्देश दिलेः

*"५५. कायद्याचे राज्य उत्तम राखण्यासाठी आणि उत्तम न्यायदान करण्यासाठी उच्च न्यायालयांना काही निर्देश देण्यात आले आहेत:*

*एकत्रित स्वरूपात डेटाचे विश्लेषण करताना, हे न्यायालय न्यायदानातील सर्वात महत्त्वाच्या घटकाकडे दुर्लक्ष करू शकत नाही. प्रथम खबरी अहवाल नोंदवल्यानंतर किंवा योग्य प्रकरणांमध्ये खटला चालवण्याच्या अनुषंगाने तपासाला*

*स्थगिती देण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार निर्विवाद आहे. परंतु या न्यायालयाचे असे मत आहे की, या अधिकाराच्या वापरासोबत खटला जलदगतीने निकाली काढण्याची जबाबदारी सुद्धा आहे. तपास आणि खटल्याला स्थगिती देण्याचा अधिकार हा उच्च न्यायालयांना दिलेला एक असामान्य अधिकार आहे आणि या अधिकाराचा वापर केवळ प्रक्रियेचा दुरुपयोग रोखण्यासाठी आणि न्यायिक हेतूंना प्रोत्साहन देण्यासाठी केला पाहिजे. म्हणून हे स्पष्ट आहे की:*

*(i) अशा असामान्य शक्तीचा वापर योग्य सावधगिरीने आणि सतर्कतेने केला पाहिजे.*

*(ii) एकदा अशा अधिकाराचा वापर झाला की, उच्च न्यायालयाने तपास आणि खटला थांबवण्याच्या असामान्य अधिकाराचा वापर केलेल्या प्रकरणाकडे दुर्लक्ष करू नये.*

*(iii) उच्च न्यायालयाने लवकरात लवकर परंतु स्थगिती आदेश जारी झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत अशा कार्यवाहींचा शक्य तितक्या लवकर निकाली काढण्याचा मुद्दा बनवला पाहिजे.*

*५६. हे सत्य आहे की, राज्यघटनेच्या कलम २२७ अन्वये जिल्हा न्यायालयांवर जसा उच्च न्यायालयाचा अधीक्षणाचा अधिकार आहे तसा अधिकार या न्यायालयाला उच्च न्यायालयावर अधिक्षण करण्याचा नाही. या न्यायालयाप्रमाणेच, उच्च न्यायालय देखील पूर्ण अधिकार क्षेत्रासह अभिलेखाचे एक उच्च न्यायालय आहे. आपल्या*

*राज्यघटनेनुसार उच्च न्यायालय हे या न्यायालयाचे अधीनस्थ न्यायालय नाही. तथापि, या न्यायालयाला उच्च न्यायालयावर अपीलीय अधिकार तसेच इतर काही आनुषंगिक (प्रासंगिक) अधिकार आहेत. परंतु न्यायाचे शेवटचे न्यायालय म्हणून आणि संपूर्ण न्याय देण्याच्या या न्यायालयाच्या अधिकाराचा वापर करताना, ज्यामध्ये सार्वजनिक हितासाठी न्याय प्रशासनात सुधारणा करण्याचे सामर्थ्य समाविष्ट आहे, हे न्यायालय कायद्याचे राज्य आणि न्यायदान प्रणालीवर, जे अविभाज्यपणे एकमेकांशी जोडलेले आहेत सामान्य माणसाचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी उपरोक्त मार्गदर्शक तत्त्वे देत आहे.*

३५. वरील बाबी लक्षात घेता, स्थगितीमुळे दीर्घकाळ प्रलंबित राहिलेल्या कार्यवाहीची स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. केवळ भ्रष्टाचाराच्या प्रकरणांसाठीच नव्हे तर स्थगिती दिल्याच्या कारणास्तव दिवाणी आणि फौजदारी खटल्यांची कार्यवाही थांबलेल्या सर्व दिवाणी आणि फौजदारी दाव्यांसाठी उपाय करणे आवश्यक आहेत. काही वेळा स्थगितीमुळे कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केले जाते. स्थगिती रद्द झाल्यानंतरही माहिती प्राप्त होत नाही आणि कार्यवाही केली जात नाही. या परिस्थितीवर तोडगा काढण्याच्या प्रयत्नात, दिवाणी किंवा फौजदारी खटल्यांच्या कार्यवाहीला स्थगिती देणाऱ्या सर्व प्रलंबित प्रकरणांमध्ये, अपवादात्मक प्रकरणात सकारण आदेशाद्वारे (स्पीकिंग ऑर्डरद्वारे)

स्थगितीस मुदतवाढ दिल्याशिवाय, आजपासून सहा महिन्यांच्या मुदतीच्या समाप्तीनंतर ती संपुष्टात येईल असे निर्देश देणे आम्ही योग्य समजतो. भविष्यात ज्या प्रकरणांमध्ये स्थगिती मंजूर केली जाते, अशा प्रकरणांमध्ये जोपर्यंत सकारण आदेशाद्वारे (स्पीकिंग ऑर्डरद्वारे) मुदतवाढ दिली जात नाही, ती अशा आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीनंतर समाप्त होईल. सकारण आदेशाने (स्पीकिंग ऑर्डरने) हे दर्शविले पाहिजे की, खटला इतका अपवादात्मक स्वरूपाचा होता की खटला पूर्ण करण्यापेक्षा स्थगिती कायम ठेवणे अधिक महत्त्वाचे होते. संपरीक्षा न्यायालय (ट्रायल कोर्ट) जेथे दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाहीला स्थगिती देण्याचा आदेश सादर केला जातो, ते स्थगितीच्या आदेशाच्या सहा महिन्यांपेक्षा जास्त नसलेली तारीख निश्चित करू शकते. जेणेकरून स्थगितीचा कालावधी संपल्यानंतर, जोपर्यंत स्थगिती वाढवण्याचा आदेश दिला जात नाही, कार्यवाही सुरू करता येईल.

३६. अशा प्रकारे, आम्ही कायद्याला असे घोषित करतो की आरोप निश्चित करणारा आदेश हा केवळ मध्यावधी आदेश किंवा अंतिम आदेश नाही. याचिकेच्या शीर्षक काहीही असो उच्च न्यायालयाच्या कार्यक्षेत्रास प्रतिबंध नाही, मग असे प्रकरण कला कलम २२७ खाली असो वा कलम ३९७ किंवा ४८२ अंतर्गत असो तथापि, कोणत्याही प्रकारे अडथळा न येता खटल्याची जलद विल्हेवाट लावण्यासाठी उक्त

अधिकार क्षेत्र वापर वैधानिक  धोरणाशी सुसंगतपणे केला जावा. अशा प्रकारे विचार केला तर, आरोपांच्या आदेशाला आव्हान केवळ अधिकारक्षेत्राच्या स्पष्ट  त्रुटी दुरुस्त करण्यासाठी आणि प्रकरणा पुन्हा विचारात  न करण्यासाठी दुर्मिळातील दुर्मिळतम प्रकरणात ऐकले गेले   पाहिजे. कोणतीही अनिवार्य कालमर्यादा निश्चित केली जाऊ शकत नसली तरी, निर्णय सामान्यतः दोन-तीन महिन्यांपेक्षा जास्त नसावा. जर तो जास्त काळ प्रलंबित राहिला, तर राहण्याचा कालावधी सहा महिन्यांपेक्षा जास्त नसावा, जोपर्यंत आधीच सूचित केल्याप्रमाणे विशिष्ट भाषण आदेशाद्वारे मुदतवाढ दिली जात नाही. जलद न्यायाचा आदेश पीसी कायद्याच्या खटल्यांना तसेच इतर खटल्यांना लागू होतो जिथे खटल्याच्या टप्प्यातील कारवाईला उच्च न्यायालय म्हणजेच. उच्च न्यायालय किंवा यथास्थिति, उच्च न्यायालय खाली असलेले न्यायालय द्वारे स्थगिती दिली जाते. पी. सी. कायद्याशी संबंधित उच्च न्यायालये किंवा इतर न्यायालयांसमोरील सर्व प्रलंबित प्रकरणांमध्ये किंवा इतर सर्व दिवाणी किंवा फौजदारी खटल्यांमध्ये, जेथे प्रलंबित खटल्यातील कारवाईला स्थगिती स्थगिती, तेथे वरील निकषांवरील सकारण  आदेशाद्वारे मुदतवाढ दिल्याशिवाय आजपासून सहा महिन्यांनंतर स्थगिती आपोआप संपुष्टात येईल. उच्च न्यायालयांच्या अधिकारक्षेत्राखालील दिवाणी आणि फौजदारी अपील/पुनरावलोकन न्यायालये देखील हाच मार्ग अवलंबू शकतात. खटल्याची न्यायालये, वरील कालावधी संपल्यानंतर, स्थगिती वाढवण्याचा स्पष्ट आदेश सादर केल्याशिवाय इतर कोणत्याही

सूचनेची वाट न पाहता कार्यवाही पुन्हा सुरू करू शकतात.जिथे अशा प्रकारचे आव्हान स्वीकारले जाते आणि स्थगिती केले जाते, तिथे देखील दैनंदिन आधारावर निर्णय घेतला पाहिजे जेणेकरून स्थगिती जास्त काळ चालणार नाही.

३७. यालयीन स्तरावर दिवाणी किंवा फौजदारी दावे अनावश्यक कालावधीसाठी प्रलंबित राहू नये यासाठी उच्च न्यायालये देखील यासंदर्भात निर्देश जारी करू शकतात आणि त्यावर देखरेख ठेवू शकतात.

३८. या प्रश्नाचे उत्तर देण्यात आले आहे.हे प्रकरण इतर संबंधित बाबींसह, बुधवार, 18 एप्रिल, 2018 रोजी रात्रभर अर्धवट सुनावणीच्या अधीन राहून, प्रथम प्रकरण म्हणून 3 योग्य खंडपीठासमोर सूचीबद्ध केले जाऊ शकते. या आदेशाची एक प्रत सर्व उच्च न्यायालयांना आवश्यक कारवाईसाठी पाठवली जावी.

(न्यायमुर्ती आदर्शकुमार गोयल)

(न्यायमुर्ती नवीन सिन्हा)

नवी दिल्ली
२८ मार्च, २०१८ रोजी

**टीप: उद्धरणमध्ये ठळकपणे नमूद करणे आमच्याकडून केलेले आहे.**

**भारताच्या सर्वोच्च न्यायालयात प्रकाशनयोग्य**

**फौजदारी अपीलाधिकार क्षेत्र फौजदारी अपील क्र. 1375-1376 2013**

**एशियन रिसर्फेसिंग ऑफ**

**रोड एजन्सी प्रायव्हेट लिमिटेड आणि इतर ... अपीलकर्ते**

**विरुद्ध**

**केंद्रीय अन्वेषण ब्युरो .... उत्तरार्थी**

**सोबत**

**फौजदारी अपील क्र. 1383/2013**

**फौजदारी अपील क्र. 1377/ 2013**

**फौजदारी अपील क्र. 1382 /2013**

**फौजदारी अपील क्र. 1394 /2013**

**फौजदारी अपील क्र.1384/2013**

**फौजदारी अपील क्र. 1393/2013**

**फौजदारी अपील क्र. 1386-1387/ 2013**

**फौजदारी अपील क्र. 1385/ 2013**

**फौजदारी अपील क्र. 1406/ 2013**

**फौजदारी अपील क्र. 1396 /2013**

**फौजदारी अपील क्र. 1395/2013**

**2013 चा फौजदारी अपील क्र. 1391**

**2013 चे फौजदारी अपील क्र. 1389**

**2013 चे फौजदारी अपील क्र. 1388**

**2013 चे फौजदारी अपील क्र. 1398**

**2013 चे फौजदारी अपील क्र. 1397**

**विशेष अनुमती याचिका (फौज दारी) क्र. 2610 2013 चा फौजदारी अपील क्र. 1390**

**फौजदारी अपील क्र. 1399 2013 चा**

**2013 चे फौजदारी अपील क्र. 1402**

**फौजदारी अपील क्र. 2013 चा 1400**

**2013 चे फौजदारी अपील क्र. 1401**

**2013 चे फौजदारी अपील क्र. 1404**

**2013 चे फौजदारी अपील क्र. 1403**

**2013 चे फौजदारी अपील क्र. 1405**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी ) क्र. 6835/2013**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी ) क्र. 6834/2013**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी ) क्र. 6837/2014**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी) क्र. 10050-10051/2013**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी ) क्र. 9652-9653/2013**

**2014 चे फौजदारी अपील क्र. 234**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी ) क्रमांक 5678/2014**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी ) क्रमांक 1451/ 2014**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी ) क्रमांक 1399/ 2014**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी ) क्रमांक 2508/ 2014**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी ) क्रमांक 2970/ 2014**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी ) क्रमांक 2507/ 2014**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी ) क्रमांक 2939/ 2014**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी ) क्रमांक 2977/ 2014**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी ) क्रमांक 4709/ 2014**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी ) क्र.6372/2014**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी ) क्रमांक 6691-6692/ 2014**

**विशेष अनुमती याचिका (फौजदारी ) क्रमांक 9363/ 2017**

**न्यायनिर्णय**

**न्यायमूर्ती आर एफ नरिमन (सहमतीचा न्यायनिर्णय)**

१. भ्रष्टाचाराच्या कर्करोगाने राज्याच्या महत्वाच्या अंगांना ग्रासले आहे.कर्करोग हा एक भयंकर आजार आहे, जो वेळेत मुलापासून उपटून काढला नाहीतर मृत्यूला कारणीभूत ठरू शकतो.इंग्रज शासित भारतामध्ये, तत्कालीन दंड संहितेच्या नवव्या अध्यायात सरकारी कर्मचाऱ्यांच्या भ्रष्टाचाराच्या कर्करोगाबाबत चर्चा केली आहे. स्वातंत्र्यापूर्वीही या तरतुदी वेगाने पसरणाऱ्या या रोगाला तोंड देण्यासाठी अपुरी पडत होत्या. परिणामी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, 1947 अधिनियमित करण्यात आला.संतान म समितीच्या शिफारशींच्या आधारे गुन्हेगारी कायदा (सुधारणा) कायदा 1952 आणि लाचलुचपत प्रतिबंधक कायदा (सुधारणा) कायदा 1964 द्वारे या कायद्यात दोन वेळा सुधारणा करण्यात आली.1947 च्या कायद्याच्या कामकाजातून हे निष्पन्न आले की भ्रष्टाचाराच्या आजाराचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी हा कायदा पुरेसा नाही. या कारणास्तव, भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा, 1988 अधिनियमित करण्यात आला (यापुढे हा कायदा म्हणून संदर्भित आहे).या कायद्याची उद्दिष्टे आणि कारणे याविषयीचे निवेदन स्पष्ट असून ते खालीलप्रमाणे आहे:

**उद्दिष्टे आणि कारणांचे निवेदन:**

१. सध्याचे भ्रष्टाचारविरोधी कायदे अधिक प्रभावी करण्यासाठी आणि त्यांची व्याप्ती वाढवण्यासाठी आणि तरतुदी अधिक बळकट

करण्याचा या विधेयकाचा उद्देश आहे.

२. संता नम समितीच्या शिफारशींच्या आधारे 1964 मध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, 1947 मध्ये सुधारणा करण्यात आली.भारतीय दंड संहितेच्या नवव्या अध्यायात सरकारी कर्मचारी आणि गुन्हेगारी गैरवर्तनात  त्यांना सामील असणाऱ्यां विरोधात कारवाई करण्याची तरतूद आहे.गुन्हेगारी कायदा सुधारणा अध्यादेश 1944 मध्ये भ्रष्टाचाराच्या माध्यमातून मिळवलेली बेकायदेशीर संपत्ती जप्त करण्याची तरतूद आहे.

३. लोकसेवकांमधील मधील भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी या तरतुदी अधिक प्रभावी करण्यासाठी या विधेयकात सुधारणा करण्यात आल्या आहेत.   लोकसेवक' या अभिव्यक्तीच्या व्याख्येची व्याप्ती वाढविण्याचे,  गुन्हे समाविष्ट करणे, भारतीय दंड संहितेच्या कलम 161 ते 165 अ अंतर्गत  गुन्ह्यांसाठी असलेल्या दंडाच्या तरतुदीत वाढ करणे इतर गोष्टींबरोबर संपरीक्षा न्यायालयाचा अभियोग चालू करण्याची परवानगी कायम करण्याच्या आदेशाला, जर असा आदेशाला आधीच  आव्हान दिलेले नसे आणि संपरीक्षा सुरू झाली नसेल  तर,  अंतिम ठरवणे हे या विधेयकाचे उद्देश होते. कार्यवाहीला गती देण्यासाठी, खटल्यांच्या दैनंदिन सुनावणीसाठी

तरतूद आणि स्थगिती देण्यासंदर्भातील प्रतिबंधात्मक तरतुदी आणि आंतरवर्ती आदेशांवर पुनरावलोकन करण्याच्या अधिकारांचा वापर देखील समाविष्ट करण्यात आला आहे.

४. प्रस्तावित कायद्यात कलम 161 ते 165 अ ची तरतूद वाढीव शिक्षेसह समाविष्ट केल्यामुळे भारतीय दंड संहितेतील ते कलम कायम ठेवण्याची गरज नाही.परिणामी, आवश्यक व्यावृत्ती तरतुदींसह [सेविंग प्रोव्हिजन] हे कलम काढून टाकण्याचे प्रस्तावित आहे.

५. उपकलमांवरील नोट्समध्ये विधेयकाच्या तरतुदींचे तपशीलवार वर्णन केले आहे.

(भर दिला आहे )

2. कलम 2 (सी) मध्ये" "लोक सेवकाची" व्याख्या आली आहे. ही व्याख्या अतिशय विस्तृत आहे आणि त्यात लवाद किंवा इतर व्यक्तींचाही समावेश आहे ज्यांच्याकडे कोणत्याही न्यायालयाने किंवा सक्षम न्यायालयाने निर्णय किंवा अहवालासाठी कोणताही मुद्दा किंवा बाब पाठवला आहे. यामध्ये कृषी, उद्योग, व्यापार किंवा बँकिंग क्षेत्रात कार्यरत असलेल्या नोंदणीकृत सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचाही समावेश आहे,ज्यांना सरकार कडून आर्थिक अनुदान मिळते-(कलम 2 (c) (ix) पहा).शैक्षणिक, वैज्ञानिक,सामाजिक,

सांस्कृतिक किंवा इतर संस्थांचे पदाधिकारी किंवा कर्मचारी, सरकार किंवा स्थानिक किंवा इतर सार्वजनिक प्राधिकरणांकडून आर्थिक मदत मिळवणाऱ्यांचाही यात समावेश आहे (कलम 2(c)(xii)पहा). कलम 2(सी)च्या दोन स्पष्टीकरणांमधून हेही स्पष्ट् होते की स्पष्टीकरण 1 मध्ये म्हटले आहे की लोक सेवक होण्यासाठी, सरकारने नियुक्त करण्याची आवश्यकता नाही, स्पष्टीकरण 2 ज्या ज्या ठिकाणी "लोकसेवक" हा शब्द येईल तेथे लोकसेवकाचे स्थान प्रत्यक्ष धार करणार प्रत्येक व्यक्ती असा अर्थ होईल- मग ते स्थान धारण करणाऱ्यांच्या त्याच्या अधिकारात कोणतीही वैध तृटी असो.

3. या अपिलांचा निर्णय घेताना कलम 4 (4) अत्यंत महत्वाचे आहे आणि त्यात पुढील गोष्टींचा समावेश आहेः

**"४. विशेष न्यायाधीशांकडून संपरिक्षा केली जाणारी प्रकरणे.-**

(१)-(३) xxx xxxx

(४) फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 मध्ये काहीही समाविष्ट असले तरी, विशेष न्यायाधीश शक्य तितके दैनंदिन आधारावर गुन्ह्याची सुनावणी करेल."

या विशेष कायद्यांतर्गत प्रकरणांचा वेळेवर निपटारा सुनिश्चित करणाऱ्या सुधारणांच्या अधीन राहून कलम 22 फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 लागू होते.

**"22. फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 काही सुधारणांच्या अधीन राहून लागू होईल.-**

फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 च्या तरतुदी, या कायद्यांतर्गत दंडनीय गुन्ह्याशी संबंधित

कोणत्याही कार्यवाहीला लागू होतील

(क) कलम २४३ च्या उप-कलम (१) मध्ये, "त्यानंतर आरोपीला बोलावले जाईल, " या शब्दांऐवजी "त्यानंतर आरोपीने लगेच किंवा न्यायालयाच्या परवानगीनुसार अशा व्यक्तींची यादी (जर कोणी असेल) ज्यांची साक्षीदार म्हणून तपासणी करण्याचा प्रस्ताव आहे आणि ज्या कागदपत्रांवर तो विश्वास ठेवण्याचा प्रस्ताव आहे त्यांची यादी (जर असेल) लेखी स्वरूपात द्यावी लागेल आणि त्यानंतर त्याला बोलावले जाईल" बदलले जाईल.

(ख) कलम 309 च्या उप -कलम (2) मध्ये, तिसऱ्या परंतुका नंतर, खालील परंतुका चा समावेश करण्यात आला होता, अर्थातः- -

केवळ कलम 397 अंतर्गत एखाद्या पक्षाने अर्ज केला आहे या कारणास्तव कार्यवाही स्थगित केली किंवा पुढे ढकलली जाणार नाही.""

(ग) कलम 317 च्या उप-कलम (2) नंतर खालील उप-कलम समाविष्ट करण्यात आले होते, अर्थातः- -

(३) उप-कलम (१) किंवा उप-कलम (२) मध्ये काहीही समाविष्ट असले तरी, न्यायाधीश, त्याला योग्य वाटत असेल तर आणि त्याने नोंदवलेली कारणे लक्षात घेऊन, आरोपी किंवा त्याच्या वकिलाच्या अनुपस्थितीत चौकशी किंवा खटला चालवू शकतो आणि प्रतिसादासाठी साक्षीदाराला परत बोलावण्याच्या आरोपीच्या अधिकाराच्या अधीन राहून 7 साक्षीदारांचा पुरावा नोंदवू शकतो.

(घ) कलम 397 च्या उप-कलम (1) मध्ये परंतुक देण्यापूर्वी खालील परंपरेचा समावेश करण्यात आला होता, अर्थातः- -

परंतु अशा कार्यवाहीतील एखाद्या पक्षाने केलेल्या अर्जावर या कलमांतर्गत न्यायालयाद्वारे अधिकारांचा वापर केला जात असेल तर न्यायालय सहसा कार्यवाहीचा अहवाल मागवू शकणार नाही-(क) दुसऱ्या पक्षाला अभिलेख का मागवू नये याची कारणे दाखवण्याची संधी न देता किंवा

(ख) कार्यवाहीचे अभिलेखाचे परीक्षण प्रमाणित प्रतींवरून केले जाऊ शकते असे समाधान झाल्यास."

कलम 27 अंतर्गत, फौजदारी प्रक्रिया संहितेद्वारे प्रदान केलेल्या अपील आणि पुनरावलोकनाच्या अधिकारांचा या कायद्याच्या तरतुदींच्या अधीन राहून वापर केला जाईल.कलम 27 खालीलप्रमाणेः

**"27 अपील आणि पुनरावलोकन.- -**

या कायद्याच्या तरतुदींच्या अधीन राहून, उच्च न्यायालय, फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 द्वारे प्रदान केलेल्या अपील आणि पुनरावलोकनाच्या सर्व अधिकारांचा वापर उच्च न्यायालय स्थानिक मर्यादेत 12 प्रकरणांची सुनावणी करणारे सत्र न्यायालय असल्याप्रमाणे करू शकेल."

४. कलम 19 (3) (c) चा खरा अर्थ लावणे आणि या देशातील उच्च न्यायालये भारतीय संविधानाच्या कलम 226 आणि 227 अंतर्गत दाखल याचिकांमध्ये कलम 19 (3) (c) चे पालन करण्यास बांधिल आहेत का ? हा या अपिलांमधील वादाचा मुख्य मुद्दा आहे. संबंधित दुसरा प्रश्न हा आहे की, या अधिनियमाच्या अंतर्गत प्रकरणे फौजदारी व्यवहार संहितेच्या कलम 482 अन्वये स्थगित करण्यासाठीची अंगभूत शक्ती उच्च न्यायालयाकडे आहे का? कलम 19 खालीलप्रमाणे आहे:

"19. खटल्यासाठी पूर्व - मंजुरी आवश्यक आहे.- -

लोकपाल आणि लोकायुक्त कायदा 2013 च्या कलम 7,10,11,13 आणि 15 अन्वये लोकसेवकाने केलेल्या कथित गुन्ह्याची दखल, पूर्वमंजुरी असल्याच्या अपवादाखेरीज, कुठलेही न्यायालय घेणार नाही [ लोकपाल व लोकायुक्त अधिनियम 2013 मध्ये अन्यथा उपबंधित केले असे त्याव्यतिरिक्त]-

(क) केंद्र सरकारच्या मंजुरीशिवाय किंवा त्या सरकारच्या मंजुरीशिवाय, संघटनेची कामे करणाऱ्या आणि आपल्या पदावरून हटविला न जाऊ शकणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत,

(ख) एखाद्या व्यक्तीच्या बाबतीत जी एखाद्या राज्याच्या कामकाजाशी संबंधित आहे आणि राज्य सरकारच्या मंजुरीशिवाय किंवा त्या सरकारच्या मंजुरीशिवाय तिच्या कार्यालयातून काढता येणार नाही.

(ग) अन्य कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, त्याला त्याच्या पदावरून दूर करण्यासाठी

सक्षम प्राधिकाऱ्याच्या (२) उप-कलम (१) अंतर्गत आवश्यक ती पूर्व मंजुरी केंद्र सरकार किंवा राज्य सरकार किंवा ९ अन्य प्राधिकरणांनी दिली पाहिजे की नाही याबाबत कोणतीही शंका निर्माण झाल्यास, अशी मंजुरी दिली जाईल. ज्या वेळी गुन्हा घडला होता त्या वेळी सरकारी अधिकाऱ्याला त्याच्या कार्यालयातून काढून टाकण्यास सक्षम असणारे सरकार किंवा प्राधिकरण.

(३) फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 मध्ये काहीही समाविष्ट असले तरी -

(क) विशेष न्यायाधीशांनी पारित झालेले कोणताही निष्कर्ष, शिक्षा किंवा आदेश, उप-कलम (१) अंतर्गत आवश्यक मंजुरीच्या अनुपस्थितीमुळे किंवा कोणत्याही त्रुटी, चूक, अनियमिततेच्या आधारावर अपील, पुष्टी किंवा पुनरावलोकनामध्ये न्यायालयाद्वारे उलट किंवा बदल केला जाणार नाही, जोपर्यंत त्या न्यायालयाच्या मते, प्रत्यक्षात न्यायाचे अपयश घडले नसेल

(ख) अशा त्रुटी, चूक किंवा अनियमिततेमुळे न्याय अपयशी ठरल्याबद्दल समाधान होत नाही तोपर्यंत कोणत्याही न्यायालयाने प्राधिकरणाने मंजूर केलेल्या मंजुरीतील कोणतीही चूक, चूक किंवा अनियमिततेच्या आधारावर या कायद्यांतर्गत कार्यवाहीला स्थगिती देऊ नये

(ग) कोणताही न्यायालय अन्य कोणत्याही कारणास्तव या कायद्यांतर्गत कार्यवाहीला स्थगिती देऊ शकणार नाही आणि चौकशी, सुनावणी, अपील किंवा इतर कार्यवाहीमध्ये पारित झालेले केलेल्या कोणत्याही मध्यवर्ती आदेशाशी संबंधित

पुनरावलोकन अधिकारांचा वापर करू शकणार नाही.

(४) उप-कलम (३) अन्वये, अशा मंजुरीच्या गैरहजेरीमुळे किंवा त्रुटी, चूक किंवा अनियमिततेमुळे न्याय अपयशी ठरले आहे का, हे ठरवताना न्यायालयाला हे लक्षात ठेवावे लागेल की, कार्यवाहीच्या कोणत्याही सुरुवातीच्या टप्प्यात आक्षेप नोंदवता आला असता का?स्पष्टीकरण.या कलमाच्या हेतूंसाठी,-(क) त्रुटीमध्ये मंजुरीसाठी प्राधिकरणाची योग्यता समाविष्ट आहे

(ख) अभियोजनासाठी आवश्यक असलेल्या मंजुरीमध्ये विशिष्ट अधिकाऱ्याच्या सूचनेनुसार किंवा विशिष्ट व्यक्तीच्या मंजुरीसह किंवा समान स्वरूपाची आवश्यकता असलेल्या कोणत्याही आवश्यकतेचा संदर्भ समाविष्ट आहे."

5. दिल्ली उच्च न्यायालय दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे पाठवलेल्या एका प्रस्तावावर, विद्वान मुख्य न्यायाधीशांनी तीन पैलू तयार केले जे विचारात घेण्याजोगे आहेत असे त्यांनी वर्णन केले आहेः

''(क) 1988 च्या कायद्यांतर्गत आरोप निश्चित करणाऱ्या आदेशाला या न्यायालयाच्या पुनरावलोकन अधिकाराचा वापर करण्यापासून रोखणारा एक अंतरवादीक आदेश म्हणून मानले जाईल का?

(ख) 1988 च्या कायद्याच्या कलम 19 मध्ये वापरली गेलेली भाषा जी पुनरीक्षणाला प्रतिबंध करते ती सर्व कारणांसाठी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 482 अंतर्गत

अधिकारांचा वापर करण्यास प्रतिबंध करेल का?

(ग) भारतीय राज्यघटनेच्या कलम 227 अंतर्गत आरोप निश्चित करण्याच्या आदेशावर आक्षेप घेतला जाऊ शकतो का?"

या तीन पैलूंची उत्तरे परिच्छेद 33 मध्ये खालील प्रमाणे आहेतः

वरील चर्चेच्या पार्श्वभू मीवर, आम्ही खालील अटींवर या संदर्भाचे उत्तर देतोः

(क) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, 1988 अंतर्गत आरोप निश्चित करणारा आदेश हा एक अंतर्वादीक आदेश आहे.

(बी) कलम 19 (3) (सी) स्पष्टपणे आंतरवादिक आदेशाविरुद्ध पुनरावलोकन करण्यास प्रतिबंध करते आणि आरोप निश्चित करणे हे आंतरवादिक [इंटरलॉक्युटरी] आदेश असल्यामुळे पुनरावलोकन चालण्याजोगे नाही.

(ग) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 482 अंतर्गत याचिका आणि भारतीय संविधानाच्या कलम 227 अंतर्गत दाखल केलेली रिट याचिका चालण्याजोगी आहे.

(घ) जरी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 482 अंतर्गत याचिका किंवा भारतीय संविधानाच्या कलम 11 227 अंतर्गत रिट याचिका उच्च न्यायालयाने स्वीकारली असली, तरी कोणत्याही परिस्थितीत 1988 च्या कायद्यातील कलम 19 (3) (सी) मधील प्रतिबंधाचा विचार करून स्थगिती आदेश पारित केला जाऊ नये.

(ई) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 482 अंतर्गत किंवा भारतीय राज्यघटनेच्या

कलम 227 अंतर्गत अधिकारांचा वापर मर्यादित असावा आणि अपवादात्मक परिस्थितीत सिया राम सिंग (सुप्रा), विशेष कुमार (सुप्रा), खलील अहमद बशीर अहमद (सुप्रा), कमलनाथ आणि इतर (सुप्रा) रंजीत सिंग (सुप्रा) आणि या क्षेत्रातील समान निर्णय लक्षात घेऊन त्याचा वापर केला जावा.

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 482 अंतर्गत किंवा भारतीय संविधानाच्या कलम 227 अंतर्गत असलेल्या अधिकारक्षेत्राचा वापर छुप्या पद्धतीने किंवा पुराव्याची पुन्हा दखल घेण्यासाठी अपील करण्यासाठी केला जाऊ शकत नाही, या बाबत कायदा सुनिश्चित आहे. वरील कार्यवाहीचा वापर अतिशय काळजीपूर्वक, सावधगिरी बाळगून आणि केवळ गंभीर न्यायपात टाळण्यासाठी केला जावा".

6. बंधू न्यायाधीश गोयल यांच्या न्यायनिर्णयात दोन्ही बाजूंचे युक्तिवाद मांडण्यात आले आहेत आणि त्याचा पुनरुच्चार करण्याची गरज नाही.

7. कायद्याच्या कलम 19 (3) चे अवलोकन केल्यास हे दिसून येईल की प्राधिकरणाने मंजूर केलेल्या मंजुरीतील कोणतीही चूक, वगळणूक किंवा अनियमिततेच्या आधारावर न्यायाल्याचे अशी चूक, वगळणूक किंवा अनियमितता घडली व परिणामी न्यायपात झाला आहे, या बाबत समाधान झाले असल्यास, या कायद्यांतर्गत कारवाईला स्थगिती देण्याविरोधातील बंदी उठवली जाते. कलम 19 (3) च्या कलम (बी) मध्ये हे नमूद

केल्यावर, कलम (सी) मध्ये म्हटले आहे की या कायद्यांतर्गत कोणतीही न्यायालय इतर कोणत्याही कारणास्तव कारवाईला स्थगिती देऊ शकत नाही.आमच्यासमोर अपिलार्थींच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, " अन्य कोणत्याही आधारावर" ही अभिव्यक्ती मंजुरीच्या आधारांबद्दल संदर्भीय आहे न कि, अधिनियमांतर्गत सर्व कार्यवाहींना सामान्यतः लागू होते. तर प्रतिवादींचे विदवान वकील युक्तिवाद करतात की, हे आधार या अधिनियमांतर्गत कार्यवाहींना लागू होतात व उप-कलम [क] मध्ये नसलेले शब्द अर्थात हे आधार केवळ मंजुरीपुरतेच आहेत, त्यात उप-कलमात घालण्यास कोणतेही कारण नाही.

8. खालील कारणांमुळे प्रतिवादी या निवेदनात योग्य आहेत असे आमचे मत आहेः

(i) कलम 19 (3) (बी) मध्ये मंजूर केलेल्या मंजुरीशी संबंधित सर्व कारणांचा समावेश आहे.1] "" "कोणत्याही" "या शब्दावरून हे स्पष्ट होते की मंजूर केलेल्या मंजुरीमध्ये कोणतीही चूक, चूक किंवा अनियमितता असली तरी त्याशी संबंधित सर्व कारणे कव्हर केली जातात."

(ii) स्पष्टीकरण (ए) मध्ये हे अधिक स्पष्ट केले आहे, ज्यात मंजुरी देण्याची प्राधिकरणाची योग्यता समाविष्ट करणे म्हणून त्रुटी परिभाषित केली आहे.

(iii) उपखंड (ब ) मधील “"प्राधिकरणाने दिलेली मंजुरी "” हे शब्द उपखंड (सी) मधील त्यांच्या अनुपस्थितीमुळे सुस्पष्ट होत असून, या कायद्यांतर्गत चालणाऱ्या

कार्यवाहीचा संदर्भ देण्यात आला आहे हे दाखवतात.

(iv) म्हणून, "इतर कोणत्याही आधारावर " ही अभिव्यक्ती प्राधिकरणाने दिलेल्या मंजुरीशी संबंधित असलेल्या कारणाव्यतिरिक्त या कायद्याच्या अंतर्गत केल्या जाणाऱ्या कार्यवाहीमध्ये उपलब्ध असलेल्या इतर सर्व कारणांशी संबंधित आहे.

(v) येथे अनेकार्थता आहे या गृहितकावर असून त्याबाबत दोन दृष्टीकोन शक्य होत आहेत आणि त्यातील कायद्याच्या उद्दिष्टांशी बहुतांश जे मत जुळते आणि जे कायद्याला व्यवहार्य बनवते, तेच मत नियंत्रक मत म्हणून आवश्यक आहे. दंडविषय संविधी देखील केवळ त्यांच्या शाब्दिक भाषेद्वारे नव्हे तर संसदेने साध्य केलेल्या उद्देशाने देखील अधिशासित केले जातात या बाबत कायदा सुनिशित आहे. (पहा कु. इरा, द्वारा डॉ. मंजुळा क्रिपेंडोर्फ विरुद्ध राज्य (दिल्ली सरकार) आणि इतर, २०१७ एससीसी ऑनलाईन एससी ७८७, परिच्छेद १३४-१४०).

(vi) मधू लिमये विरुद्ध महाराष्ट्र राज्य, (१९७७) ४ एससीसी ५५१ मध्ये ५५८ मध्ये या न्यायालयाने म्हटले आहे, "रिव्हर वेअर कमिशनर्स वि. विल्यम एडमसन (१८७६-७७) २ एसी ७४३ आणि आर. एम. डी. चमरबॉगवाला वि. द युनियन ऑफ इंडिया, एआयआर १९५७ एससी ६२८ या प्रकरणात हे वारंवार निदर्शनास आणून दिले आहे की एखाद्या विशिष्ट संविधीत उद्धवलेले शब्द सोपे आणि सुस्पष्ट असले तरी, त्यांचे विवेचन त्या संविधीच्या इतर तरतुदींच्या संदर्भात सुयोग्य ठरेल आणि विधानमंडळाचा खरा हेतू साध्य होईल अशा पद्धतीने केले जावे. वरील उद्दिष्टे आणि

कारणे यांच्या निवेदनातून हे स्पष्ट होते की, कलम १९ (३) (ग) चे वाचन कलम ४ (४) आणि कलम २२ सह केले पाहिजे, ज्यातून हे स्पष्ट होते की कायद्यांतर्गत प्रकरणांचा निर्णय अत्यंत जलद गतीने आणि अंतर्वर्ती स्थगिती आदेशाच्या स्वरूपात कोणत्याही त्रुटीशिवाय घ्यावा लागेल.

कलम २२ (अ) अंतर्गत, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४३ (१ ) कठोर करण्यात आले आहे, ज्यात आरोपीने न्यायालयाच्या परवानगीनुसार त्वरित किंवा वेळेत साक्षीदार म्हणून आणि कागदपत्रे म्हणून ज्यांच्यावर विश्वास ठेवण्याचा प्रस्ताव आहे अशा व्यक्तींची यादी सादर करणे आवश्यक आहे, जेणेकरून प्रकरण अत्यंत जलद गतीने चालवता येईल. त्याचप्रमाणे, कलम २२ च्या उपखंड (ब) व कलम ३०९ अंतर्गत समाविष्ट करण्यात आलेले चौथे परंतुक हे सुस्पष्ट करते की, केवळ कलम ३९७ च्या अंतर्गत पक्षकाराने कार्यवाहीसाठी अर्ज केला आहे या आधारावर स्थगिती देण्यात येणार नाही.

(vii) अपिलकर्त्यांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, कलम १९ च्या उपकलम (४) मुळे हे स्पष्ट होते की, कलम १९ मधील समाविष्ट उपकलम (३) मधील विषय केवळ मंजुरी आणि मंजुरीच आहे. सदरचा युक्तिवाद एका साध्या कारणास्तव तर्कदृष्ट ठरतो ते म्हणजे उप कलम ४ मधील विषयवस्तू हे कलम १९(३) (क) व (ख)मधील परंतूक स्वरूपात आहे जे स्पष्ट करते की, मंजुरीस स्थगिती जर न्यायाच्या निष्फळतेस कारणीभूत ठरल्यास त्याबाबत त्वरीत न्याय निर्णय घेणे

आवश्यक आहे, तसे न झाल्यास केवळ ह्या आधारावर फेटाळले जाऊ शकते.

कलम २२ च्या उपखंड (ग ) अंतर्गत, न्यायाधीश हे कलम ३१७ (१) आणि (२) मध्ये काहीही असो, जर त्याला योग्य वाटल्यास, आणि त्याने नोंद करावयाच्या कारणांसाठी, आरोपीच्या किंवा त्याच्या वकिलाच्या अनुपस्थितीत, चौकशी किंवा संपरीक्षा सुरु करू शकेल आणि साक्षीदाराला उलटतपासणीसाठी पुन्हा बोलाविण्याच्या आरोपीच्या अधिकाराच्या अधीनतेने कोणत्याही साक्षीदाराचा पुरावा नोंदवू शकेल हे पुन्हा केले जाऊ शकते जेणेकरुन या कायद्यांतर्गत चौकशी किंवा खटल्याच्या कार्यवाहीत विलंब होणार नाही. ज्याआर्थी उपखंड (घ) चा संबंध आहे, त्याअनुषंगाने या न्यायालयाने गिरीश कुमार सुनेजा विरुद्ध सीबीआय, (२०१७) १४ एससीसी ८०९, ८४७ या खटल्यात असा निर्णय दिला की:

> "फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३९७ (१) मध्ये परंतुक समाविष्ट करून संसदेने हे स्पष्ट केले आहे की उच्च न्यायालय आपल्या पुनरावलोकन अधिकार क्षेत्राचा वापर करत असतानाही विशेष न्यायाधीशांसमोर प्रकरणाचे अभिलेख न मागवणे योग्य ठरेल. याचे कारण अगदी स्पष्टपणे असे आहे की एकदा अभिलेख मागवल्यानंतर विशेष न्यायाधीश प्रकरणाची संपरीक्षा पुढे नेऊ शकत नाहीत.उच्च न्यायालयाच्या पुनरावलोकन अधिकार क्षेत्राचा अवलंब करणाऱ्या आरोपीवर कोणताही पूर्वग्रह येऊ नये आणि त्याच वेळी खटल्याला अप्रत्यक्षपणे स्थगिती दिली जाऊ नये किंवा कुठलीही बाधा येऊ

नये यासाठी संसदेने हे स्पष्ट केले आहे की विशेष न्यायाधीशांच्या अभिलेखांची तपासणी देखील अभिलेखांच्या प्रमाणित प्रतींच्या आधारे केली जाऊ शकते.भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यांतर्गत प्रकरणाच्या सुनावणीत कोणताही अडथळा येऊ नये हा संसदेचा हेतू याद्वारे स्पष्ट आहे.''

(viii) कलम १९ (3) (ग) हे स्पष्ट करण्यासाठी आवश्यक ठरते की, ह्या कायद्यांतर्गत कार्यवाहीस स्थगिती ही मंजुरीतील चूक, वगळणूक किंवा अनियमिततेमुळे न्यायाच्या निष्फळतेस कारणीभूत झाले असावे अन्य कोणत्याही कारणाने नाही.या कारणास्तव फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३९७ (२) मध्ये याचा पुनरुच्चार करणे आवश्यक होते की, कलम १९ (३)(ख) मध्ये समाविष्ट असलेल्या प्रकरणांव्यतिरिक्त इतर सर्व प्रकरणांमध्ये कोणतेही न्यायालय पारित होणाऱ्या अन्तर्वादिक आदेशाच्या संदर्भात पुनरावलोकनाच्या अधिकाराचा वापर करणांर नाही.हे लक्षात घेणे देखील महत्वाचे आहे कि, कलम १९(३)(ग) ची व्याप्ती हि कार्यवाहीच्या प्रत्येक टप्प्यावर म्हणजेच चौकशी, संपरीक्षा, अपील किंवा अन्य असून ते असे स्पष्ट करते की, हेतू साध्य करण्याच्या उद्देशाने भ्रष्टाचार प्रतिबंध प्रकरणांची सुनावणी केवळ नियमित न्यायालयांव्यतिरिक्त इतर न्यायालयानीच केली पाहिजे एवढेच नाही तर उलटपक्षी ते शक्य तितक्या लवकर निकाली काढणे आवश्यक आहे. अन्यथा भ्रष्ट सरकारी कर्मचारी पदावर कायम राहतील आणि कर्करोगाप्रमाणे संपूर्ण समाजास आतून पोखरून टाकतील.

९. या कायद्यांतर्गत एखादी संपरीक्षा स्थगित करण्यासाठी उच्च न्यायालयास अशी अंगभूत शक्ती उपलब्ध आहे की नाही हा प्रश्न या चौकशीप्रत नेतो की, संविधिक कायद्याच्या विरुद्ध अशी अंगभूत शक्ती अधटनात्मक वाटते का? सर्वप्रथम हे मान्य केले पाहिजे की उच्च न्यायालये ही राज्यघटनेने स्थापित केली आहेत व ती अशी अभिलेख न्यायालये आहेत ज्याना स्वतःचा अवमान करणाऱ्यांना शिक्षा देण्याचे सर्व अधिकार असतील (कलम २१५ पहा).उच्च न्यायालय हे अभिलेखांचे वरिष्ठ न्यायालय असल्याने त्याच्या स्वत:च्या अधिकार क्षेत्रासंबंधी प्रश्न जेव्हा त्याच्यासमोर उपस्थित केले जातात तेव्हा त्यावर विचार करण्याचा न्यायालयास अधिकार आहे१९६४ च्या विशेष संदर्भ १ मध्ये, (१९६५) १ SCR ४१३ च्या प्रकरण क्रमांक ४९९मध्ये या न्यायालयाच्या घटनापीठाने दिलेल्या निर्देशात्मक परिच्छेदात, श्री गजेंद्रगडकर, सर न्यायाधीश असे मत मांडतात की ,

> ‘‘याव्यतिरिक्त, अभिलेखांच्या बाबतीत एखादी बाब त्याच्या अधिकार क्षेत्र क्षेत्रात येते की नाही याचा विचार करणे हे न्यायालयाचे काम आहे.तसेच मर्यादित अधिकारक्षेत्राच्या विपरीत उच्च न्यायालयाला स्वतःच्या क्षेत्राधिकाराविषयी प्रश्न ठरवण्याचा अधिकार आहे."सकृत दर्शनी" हाल्सबरी म्हणतात की "कोणतीही बाब वरिष्ठ न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राच्या पलीकडे असल्याचे मानले जात नाही जोपर्यंत ते स्पष्टपणे दर्शविले जात नाही तर कोणतीही बाब खालच्या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राच्या अखत्यारीत येत

नाही जोपर्यंत खटल्याच्या चौकटीत स्पष्टपणे दाखवले जात नाही. कोणत्याही कार्यवाहीच्या तोंडावर हे स्पष्टपणे दाखविले जाईपर्यंत कोणतीही गोष्ट कनिष्ठ न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात नसते ." [हाल्सबरीज लॉ ऑफ इंग्लंड, खंड-९ पृष्ठ- ३४९]''

१०. तसेच, रतिलाल भानजी मिठानी विरुद्ध असिस्टन्ट कलेक्टर ऑफ कस्टम , १९६७ एससीआर (३) ९२६,९३०-९३१ या प्रकरणात या न्यायालयाने असे मत व्यक्त केले आहे की, फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ च्या कलम ५६१-अ अंतर्गत उच्च न्यायालयास प्राप्त अंगभूत शक्ती ही फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४८२ च्या समतुल्य आहे. या कलमानुसार कोणतेही अधिकार देण्यात आले नसले तरी संहितेतील या कलमांतर्गत कोणतीही बाब उच्च न्यायालयाच्या विद्यमान अधिकारांना मर्यादित किंवा प्रभावित करणार नाही असे घोषित करण्यात आले.न्यायालयाने पुढे असे म्हटले आहे की,

'' कलमांशी संबंधित असलेले परंतुक हे महत्वाचे नाही आणि त्याचे वाचन करण्याची गरज नाही.विद्यमान उच्च न्यायालयांचे अधिकार क्षेत्र आणि न्याय प्रशासनाशी संबंधित न्यायाधीशांचे अधिकार क्षेत्र राज्यघटनेच्या प्रारंभापूर्वी असलेल्या अधिकार क्षेत्रांप्रमाणेच असतील, असे या कलमात म्हटले आहे. राज्यघटनेने याद्वारे पुष्टी केली आणि उच्च न्यायालयाला त्याचे सर्व विद्यमान अधिकार आणि अधिकारक्षेत्र त्याच्या अंगभूत अधिकारांसह आणि नियम बनविण्याच्या अधिकारांसह पुनर्निहित केले आहे. जेव्हा राज्यघटना किंवा कोणत्याही अंमलात

आणलेल्या कायद्याने पूर्वी अस्तित्वात असलेल्या उच्च न्यायालयाचे अंतर्निहित अधिकार आणि अधिकार क्षेत्र स्वीकारले आणि पुष्टी केली, तेव्हा त्या अधिकार आणि अधिकारक्षेत्राला ए.के. गोपालन ( १९५० SCR ८८) च्या प्रकरणात स्पष्ट केल्याप्रमाणे कलम २१ मधील उद्धृत अर्थामध्ये एक अधिनियमित "कायदा" आहे हे स्पष्ट होत आहे. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५६१-अ द्वारे संरक्षित उच्च न्यायालयाची अंगभूत शक्ती हि कलम २१ मधील उद्धृत अर्थामध्ये कायद्याद्वारे समाविष्ट केली गेली आहेत.या अधिकारांचा वापर करण्याची प्रक्रिया उच्च न्यायालयाने तयार केलेल्या नियमांद्वारे नियंत्रित केली जाते.असे नियम बनवण्याचे अधिकार राज्यघटनेने उच्च न्यायालय दिले आहेत.यापूर्वी लागू असलेले नियम घटनेच्या कलम ३७२ द्वारे कायम ठेवण्यात आले होते जामीन रद्द करण्याचा आदेश देऊन उच्च न्यायालयाचा आदेश आणि अपीलकर्त्याला त्याच्या वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित ठेवणे हे कायद्याने स्थापित प्रक्रियेनुसारच आहे आणि ते कलम २१ चे उल्लंघन करणारे नाही. "

११. यावरून हे स्पष्ट होते की राज्यघटनेद्वारे स्थापित न्यायालयाकडील अंगभूत शक्ती अशी शक्ती आहे कारण ते अभिलेखांचे वरिष्ठ न्यायालय आहे म्हणून त्या न्यायालयाकडे अशी शक्ती आली आहे , न की, केवळ फौजदारी प्रक्रिया संहितेद्वारे ते प्रदान केलेले आहे. यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे कलम २१५ मधील नाहीत इतर बाबींबरोबर राज्यघटनेनेच हे

अधिकार प्रदान केले आहेत. तसेच, उच्च न्यायालयांना घटनेच्या कलम २२६ अंतर्गत नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्याचे अधिकार आहेत नव्हे ते त्यांचे कर्तव्य आहे तसेच नागरिकांच्या स्वातंत्र्याशी संबंधित प्रकरणांमध्ये न्याय करण्याचे अंतर्निहित अधिकार देखील घटनेच्या कलम २१ मध्ये उद्‌धृत करण्यात आले आहेत. ही घटनात्मक स्थिती असून ज्याद्वारे हे स्पष्ट होते की, कलम १९ (३) (सी) हे केवळ फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेच्या विचारयोग्यतेवर बंदी म्हणून वाचले जाऊ शकत नाही तर कलम १९ (३) मधील अधिभावी खंड केवळ फौजदारी प्रक्रियेच्या संहितेला लागू होते सत्य नारायण शर्मा वि. राजस्थान राज्य, (२००१) ८ एस. सी. सी. ६०७ यातील परिच्छेद १४ आणि १५ मधील न्यायनिर्णयात योग्य स्थिती नमूद केलेली नाही. त्याचप्रमाणे, उक्त निकालाच्या परिच्छेद १७ मध्ये, योग्य प्रकरणांमध्ये कार्यवाही "अनुकूल" केली जाऊ शकते हे स्पष्टीकरण असूनही, न्यायालयाने असे म्हटले आहे की प्रकरणांच्या संपरीक्षेस स्थगिती देण्यास पूर्णपणे बंदी आहे आणि म्हणूनच, कलम ४८२, जरी रुपांतरित केले असले तरी उपरोक्त उद्देशासाठी ते वापरले जाऊ शकत नाही. हे पुन्हा येथे नमूद केलेल्या कायद्याच्या स्थितीच्या विरुद्ध आहे.त्यामुळे हे प्रकरण नामंजूर करण्यात येत आहे.

१२. या वेळी मधू लिमये (पूर्वोक्त ) मधील 3 न्यायाधीशांच्या खंडपीठाच्या निर्णयावर विचार करणे महत्वाचे आहे. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३९७ (२) मध्ये बंदी असूनही दंड संहितेच्या कलम ५०० अंतर्गत सत्र न्यायाधीशांच्या याचिका कर्त्याविरुद्धच्या

दोषारोप सिद्धीच्या आदेशाविरोधात फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत दाखल केलेली याचिका विचारार्थ योग्य ठरेल असा निर्णय या न्यायालयाच्या ३ न्यायाधीशांच्या खंडपीठाने दिला आहे. हे दोन बाबींवर अवलंबून आहे. एक, कलम ३९७(१) २१ जरी कलम३९७(२) मध्ये असलेल्या प्रतिबंधामुळे रद्द झाले तरी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत न्यायालयाला अंगभूत शक्ती उपलब्ध होतील. अमरनाथ विरुद्ध हरियाणा राज्य, (१९७७)४ एससीसी १३७ चा संदर्भ दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला, जो २ न्यायाधीशांच्या खंडपीठाचा निर्णय होता, ज्यामध्ये कलम ४८२ मधील अंगभूत शक्ती कलम ३९७(२) मधे समाविष्ठ प्रतिबंधावर मात करण्यासाठी उपलब्ध होणार नाही असा निर्णय दिला होता.

तीन न्यायधीशांच्या खंडपीठाने अमरनाथ (उपरोक्त) प्रकरणातील निकालाचा संदर्भ देत असे म्हटले की,

> "७ . या पुढे नमूद केलेल्या कारणांमुळे आम्हाला असे वाटते की मुद्दा क्रमांक १ मधील कायद्याचे विधान अचूक नाही आणि त्यात काही बदल करण्याची आवश्यकता आहे." "मात्र आम्ही दुसऱ्या मुद्द्यावर न्यायालयाच्या निर्णयाचा पुनरुच्चार करणार आहोत." (पृष्ठ ५५४ वर )

या न्यायालयाने एका महत्त्वाच्या परिच्छेदात पुढे असे म्हटले होतेः

> "१०. अमरनाथ प्रकरणात नमूद केल्याप्रमाणे, एखाद्या अपील, चौकशी, संपरीक्षा किंवा इतर कार्यवाहीमध्ये पारित झालेल्या कोणत्याही अंतर्वादिक

आदेशासंबंधित पुनरीक्षणाच्या शक्तीवर प्रतिबंध घालण्याचा उद्देश अखेरीस प्रकरणांचा जलद निपटारा करणे हा आहे. अनेकदा उच्च न्यायालयाच्या पुनरीक्षण शक्तींचा वापर अंतर्वादिक आदेश संदर्भात केला गेला ज्यामुळे कार्यवाही पूर्ण होण्यास विलंब झाला. कायदेमंडळाने आपल्या अधिकारकक्षेत या विलंबाला आळा घालण्यासाठी कलम ३९७ मध्ये उपकलम (२ ) समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला.एकीकडे उच्च न्यायालयास (तसेच सत्र न्यायाधीशांना) कुठल्याही अंतर्वादिक आदेशासंबंधित पुनरीक्षण शक्तींचा वापर करण्यासाठी अडथळा आणण्यात आला आहे, तर दुसरीकडे १८९८ च्या संहितेतील शक्तीनप्रमाणेच शक्ती(अधिकार) प्रदान करण्यात आलेल्या(आलेले) आहेत. तथापि, कलम ४८२ चे साधे वाचन केल्यावर, संहितेतील कोणतीही गोष्ट, ज्यात कलम ३९७ चे उप-कलम (२ ) देखील समाविष्ट असेल, "उच्च न्यायालयाच्या अंगभूत शक्तींवर मर्यादा घालते किंवा परिणाम करते", असे मानले जाणार नाही. परंतु, जर आपण असे म्हणालो की, कथित प्रतिबंध हा अंगभूत शक्तीचा वापर सुरू ठेवण्यात मुळीच केला जात नाही, तर पुनरीक्षण शक्तींच्या वापरावर लादण्यात आलेल्या मर्यादांपैकी एक मर्यादा नाहीशी होईल. अशा परिस्थितीत सुसंवाद साधण्याचा मार्ग कोणता?आमच्या मते, या समस्येवर एक समधानकारक तोडगा असा म्हणता येईल की कलम३९७ च्या उप-कलम (२ ) मधील

प्रतिबंधात्मक तरतुदी केवळ उच्च न्यायालयाच्या पुनरीक्षण शक्तींचा वापर करण्यातच लागू होतात, याचा अर्थ असा आहे की उच्च न्यायालयाला कोणत्याही अंतर्वादिक आदेश संदर्भात पुनरीक्षण करण्याची शक्ती नाही.मग वर नमूद केलेल्या इतर तत्त्वांपैकी एका तत्त्वानुसार, व्यथित पक्षाच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी संहितेत कोणतीही तरतूद नसल्यामुळे अंगभूत शक्ती कार्यान्वित होईल.परंतु जर आक्षेपित आदेश पूर्णपणे अंतर्वादिक स्वरूपाचा असेल जो की १८९८ च्या संहितेअंतर्गत उच्च न्यायालयाच्या पुनरीक्षण शक्तीचा वापर करुन दुरुस्त केला जाऊ शकतो , तर उच्च न्यायालय आपल्या अंगभूत शक्ती वापर करण्यास नकार देईल. परंतु जर आक्षेपित आदेशामुळे स्पष्टपणे अशी परिस्थिती निर्माण झाली असेल जी न्यायालायीन प्रक्रियेचा गैरवापर आहे किंवा न्यायप्राप्तीच्या उद्देशाने उच्च न्यायालयाचा हस्तक्षेप आवश्यक आहे, तर कलम ३९७(२) मधील कोणतीही गोष्ट उच्च न्यायालयाच्या अंगभूत शक्तींच्या वापरावर मर्यादा आणू शकत नाही किंवा त्यावर परिणाम करू शकत नाही. पण अशी प्रकरणे फारच कमी असतील.उच्च न्यायालयाने आपल्या अंगभूत शक्तींचा वापर अतिशय कमी प्रमाणात केला पाहिजे. अशा प्रकारचा एक खटला म्हणजे बेकायदेशीरपणे , त्रासदायकरित्या किंवा अधिकार क्षेत्राबाहेरील सुरू केलेली फौजदारी कारवाई इष्ट रित्या रद्द करणे ठरेल. उदाहरणार्थ, भ्रष्टाचार

प्रतिबंधक कायद्यांतर्गत परवानगी न घेता संपरीक्षा चालवल्यास, आरोपीची संपरीक्षा अधिकार क्षेत्राबाहेरील असेल आणि त्याच्या दुसर्या संपरीक्षा दोषमुक्तीनंतरही, योग्य मंजुरी मिळाल्यानंतर, प्राग्दोषमुक्तीच्या सिद्धांताआधारे बंदी घातली जाणार नाही. गृहित धरता, जरी आपण सध्या हे दाखवून देऊ की असे नाही, तरी अशा प्रकरणात न्यायालयाचा दखल घेण्याचा किंवा प्रक्रिया जारी करण्याचा आदेश हा एक अंतर्वादिक आदेश आहे, आरोपींना शेवटपर्यंत त्रास देण्याऐवजी फौजदारी कार्यवाही लवकरात लवकर थांबवण्यासाठी उच्च न्यायालयास अंगभूत शक्तीचा वापर करता येणार नाही असे म्हणणे तर्कसंगत ठरेल का? याचे उत्तर स्पष्ट आहे की, न्यायालयाच्या प्रक्रियेचा गैरवापर रोखण्यासाठी आणि/किंवा न्यायाचा उद्देश साध्य करण्यासाठी प्रतिबंध केला जाणार नाही. व्यथित पक्षाने कोणत्या शीर्षकाखाली याचिका दाखल केली हे महत्वाचे नाही. उच्च न्यायालय आपल्या अंगभूत शक्तींच्या अंतर्गत योग्य प्रकरणात त्या प्रकरणाचे परीक्षण करू शकते. सध्याचे प्रकरण निःसंशय १९७३ च्या संहितेच्या कलम ४८२ नुसार उच्च न्यायालयाने अधिकारांचा वापर करण्यासारखे आहे, गृहीत धरता, जरी असे स्वीकारले नसले की , उच्च न्यायालयाने पुनरीक्षण शक्तीचा वापर करणे अस्वीकार्य आहे.

(पृष्ठ ५५५-५५६ वर )

१३. ज्या दुसऱ्या आधारावर हा खटला निकाली काढण्यात आला तो असा होता की, आरोप निश्चित करणारा आदेश हा कलम ३९२ (२) चे प्रतिबंध लागू करण्यासाठी पूर्णपणे अंतर्वादिक आदेश नव्हता, तर तो अंतिम आणि पूर्णपणे अंतर्वादिक आदेशाचा "मध्यवर्ती" प्रकारचा असेल, इंग्रजी/ब्रिटिश निर्णयांनी ठरवलेल्या आणि आपल्या न्यायालयांनी अनुसरलेल्या चाचणीच्या अनुषंगाने, म्हणजेच जर विचाराधीन आदेश पलटला तर कारवाई सुरू राहील किंवा समाप्त केली जाईल. या चाचणीचा वापर करून, आरोप निश्चित करण्यास नकार देणाऱ्या आदेशात, कारवाई चालू ठेवली जाणार नाही आणि कलम ३९७(२) अंतर्गत ती रद्द केली जाईल असे म्हटले होते.

१४. व्ही. सी. शुक्ला विरुद्ध राज्य द्वारा सी.बी.आय (१९८०) पुरवणी एस. सी. सी. ९२ (पान नं. १२८-१२९) या खटल्यात४ न्यायाधीशांच्या खंडपीठाने या न्यायनिर्णयाची पुष्टी केली होती, जेथे विशेष न्यायालय कायदा, १९७९ च्या कलम ११ अन्वये असे म्हटले गेले होते की, ही योजना फौजदारी प्रक्रिया संहितेपेक्षा वेगळी आहे आणि "संहितेत काहीही अंतर्भूत असो" या शब्दांनी सुरू होणारे कलम असून , " मध्यवर्ती" /"मध्यस्थी" प्रकारचा आदेश मिळणार नाही आणि त्यामुळे आरोप निश्चित करणारा आदेश पूर्णपणे अंतर्वादिक स्वरूपाचा असल्याने त्याच्या विरोधात अपील करता येणार नाही. हे मत व्यक्त करताना न्यायालयाने नमूद केले की:

"या कायद्याच्या कलम ११(१) च्या खऱ्या अर्थाने निर्मितीवर आणि

‘इंटरलॉक्युटरी ऑर्डर’ (अंतर्वादिक आदेश) या अभिव्यक्तीचा नैसर्गिक अर्थ विचारात घेतल्यास, यात कोणतीही शंका नाही की, या कायद्यांतर्गत अपीलकर्त्याविरोधात आरोप निश्चित करण्याचा आदेश केवळ एक अंतर्वादिक आदेश होता ज्याने कार्यवाही समाप्त केली नाही किंवा पक्षांच्या अधिकारांवर अंतिम निर्णय घेतला नाही.कुप्पुस्वामी यांच्या खटल्यात नमूद केलेल्या चाचणीनुसार, आक्षेपित आदेश निःसंशय एक अंतर्वादिक आदेश होता.म्हणूनच, अंतर्वादिक आदेशाचा नैसर्गिक अर्थ विचारात घेऊन आणि अधिभावी खंडाचा वापर करून, स्थिती अशी आहे की फौजदारी प्रक्रिया संहितेच्या तरतुदी अधिभावी खंडाद्वारे स्पष्टपणे वगळण्यात आल्या आहेतआणि म्हणूनच या कायद्याच्या कलम ३९७(२) च्या आधारे असे मान्य करता येणार नाही की, आक्षेपित आदेश हा एक अंतर्वादिक आदेश नाही. या न्यायालयाने मधू लिमये विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि अमरनाथ व विरुद्ध हरयाणा राज्य खटल्यात संहितेच्या तरतुदींच्या, विशेषतः कलम ३९७ (२) च्या आधारे दिलेल्या निर्णयानुसार, ते योग्यरित्या निर्णित केले गेले होते आणि या कायद्याच्या कलम ११(१) च्या व्याख्येला लागू होऊ शकत नाहीत , ज्यात अधिभावी खंडा च्या आधारे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या तरतुदी स्पष्टपणे वगळण्यात

आल्या आहेत."

पूनम चंद जैन आणि इतर वि. फाझरू (२००४ ) १३ एस. सी. सी. २६९ (पान नं. नं. २७६-२७९ ) या खटल्यात, या न्यायालयाने असे निदर्शनास आणले होते की, व्ही. सी. शुक्ला (उपरोक्त) प्रकरणातील निकाल लागू असलेल्या विशेष कायद्याच्या पार्श्वभूमीवर दिला होता (परिच्छेद १३ पाहा).

१५. यावरून हे स्पष्ट होते की, व्ही. सी. शुक्ला (उपरोक्त) या प्रकरणाप्रमाणेच मधू लिमये (उपरोक्त) प्रकरणातील (निर्णय) लागू राहील. या न्यायनिर्णय पुढील निकालात मधू लिमये (उपरोक्त ) कशा प्रकारे समजून घेण्यात आली हे दोन्ही पक्षांमधील वादाचा पुढचा मुद्दा आहे.

१६ . गिरीश कुमार सुनेजा वि. सीबीआय, ( २०१७ ) १४ एससीसी ८०९ या प्रकरणात, या न्यायालयाच्या ३ न्यायाधीशांच्या खंडपीठाला २५ ऑगस्ट, २०१४ रोजी कोळसा क्षेत्र वाटप प्रकरणात पारित केलेल्या त्यांच्या आधीच्या आदेशाच्या परिच्छेद १० चा फेरविचार करण्यास सांगितले होते. विविध न्यायालयांमधील प्रलंबित प्रकरणे विशेष न्यायाधीशांच्या न्यायालयात हस्तांतरित करताना, या न्यायालयाने २५ ऑगस्ट २०१४ रोजी आपल्या आधीच्या आदेशात म्हटले होतेः

"१० . आम्ही हे देखील स्पष्ट करतो की तपास/संपरीक्षेच्या प्रगतीमध्ये

स्थगिती किंवा अडथळा आणणारी कोणतीही विनंती केवळ या न्यायालयासमोर केली जाऊ शकते आणि इतर कोणतेही न्यायालय याची दखल घेऊ शकत नाही."

परिच्छेद १० चा पुनर्विचार व्हावा असे सांगणारे अनेक आधार या न्यायालयासमोर मांडण्यात आले. आम्हाला (i), (ii) आणि (vii) या बाबींची चिंता आहे जे खाली दिलेले आहेत.

"(i) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम ३९७ किंवा फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत उच्च न्यायालयात पुनरीक्षण याचिका दाखल करण्याचा अधिकार काढून घेण्यात आला आहे.

(ii) या न्यायालयाच्या आदेशामुळे अपीलकर्त्यांचा घटनेच्या कलम २२६ आणि २२७ अंतर्गत याचिका दाखल करण्याचा आणि पर्यायाने न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार हिरावून घेण्यात आला आहे , जो संविधानाच्या मूलभूत रचनेचा एक भाग आहे, त्याचे उल्लंघन झालेले आहे, ज्याचे संसद देखील उल्लंघन करू शकत नाही;

(vii) भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्याच्या कलम १९(३) (क) अंतर्गत स्थगिती देण्यावरील प्रतिबंध अंतिम नाही आणि योग्य प्रकरणात, विशेषतः न्याय निष्फळ झाल्यास आरोपी व्यक्तीच्या बाजूने कारवाईला स्थगिती दिली जाऊ शकते. एखादे निर्बंधक वाचन ज्यामुळे स्वतः न्याय निष्फळ ठरू शकतो ते उच्च न्यायालयाच्या विवेकावर बंधन लादू शकते.

या न्यायालयाने इतर गोष्टींबरोबर, अमरनाथ (उपरोक्त) प्रकरणातील न्यायनिर्णयाचा तसेच त्यानंतर फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३९७ (२) लागू करण्यासाठीची उद्दिष्ट्ये आणि कारणांचे विवरणपत्र यांचा संदर्भ देत खालील प्रमाणे निवेदन दिले.

(घ) अंतर्वादिक आदेशा विरोधात पुनरीक्षण करण्याच्या शक्ती काढून घेतल्या जात आहेत, कारण फौजदारी प्रकरणांचा निपटारा करण्यास विलंब होण्यामध्ये हे एक प्रमुख कारण असल्याचे आढळले आहे;"

मधू लिमये (उपरोक्त ) प्रकरणाचा आणि अंतर्वादिक आणि दरम्यानचा आदेशांमधील फरक यांचा संदर्भ देत , या न्यायालयाने परिच्छेद २५, २९, ३० आणि ३२ मध्ये खालील प्रमाणे नमूद केले :

"२५ . कलम ३९७(२) च्या संदर्भात फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३९७(२) संदर्भात खालील तत्त्वांना मंजुरी देताना मधू लिमये प्रकरणातील या मताचा पुनरुच्चार केला.ती तत्त्वे खालीलप्रमाणे आहेतः

"(१) जर व्यथित पक्षाच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी संहितेत विशिष्ट तरतूद असेल तर त्या अधिकाराचा अवलंब करता कामा नये;

(२) कोणत्याही न्यायालयाच्या प्रक्रियेचा गैरवापर टाळण्यासाठी किंवा न्यायाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी याचा वापर फारच कमी प्रमाणात केला पाहिजे ;

(३ ) संहितेच्या इतर कोणत्याही तरतुदीत नमूद केलेल्या कायद्याच्या स्पष्ट प्रतिबंधाविरुद्ध याचा वापर केला जाऊ नये."

त्यामुळे, हे अगदी स्पष्ट आहे की फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३९७ मधील प्रतिबंध कलम ४८२ चे नियंत्रण करेल." "आम्ही या मताचे समर्थन करतो."

२९. यातून विद्वान वकीलांच्या निवेदनाच्या आणखी एका पैलूकडे आपले लक्ष वेधले जाते की, जोपर्यंत अपीलकर्त्यांचा संबंध आहे त्यांच्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत कार्यवाहीचा मार्ग देखील प्रतिबंधित आहे.अमरनाथ प्रकरणात सांगितल्याप्रमाणे आणि या निष्कर्षाशी आम्ही सहमत आहोत, जर फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३९७(२) मध्ये असलेल्या प्रतिबंधामुळे अंतर्वादिक आदेशा चा फेरविचार करता येत नसेल तर फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ चा अवलंब करून तो टाळता येणार नाही.या प्रस्तावावर कोणताही गंभीर वाद असू शकत नाही.

३० . तर मग फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ चा उपयोग काय ?मधू लिमये [मधू लिमये विरुद्ध महाराष्ट्र राज्य, (१९७७)४ SCC ५५१:१९७८ SCC (Cri) १०] या प्रकरणात याचा विचार करण्यात आला आणि स्पष्ट करण्यात आले ज्यामध्ये फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३९७(२) मधील प्रतिबंध आणि त्याच वेळी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ चा विस्तृत मजकुर निदर्शनास आणून त्यांनी हा प्रश्न उपस्थित केलाः अशा परिस्थितीत सुसंवाद साधण्याचा मार्ग

कोणता?त्यानंतर न्यायालयाने खालील प्रमाणे या प्रश्नाचे उत्तर दिले.(एससीसी पान५५५- ५६, परिच्छेद १०)

> "१०.......अशा परिस्थितीत सुसंवाद साधण्याचा मार्ग कोणता? आमच्या मते, या समस्येवर एक समधानकारक तोडगा म्हणजे कलम ३९७ च्या उप-कलम (२) मधील तरतुदी केवळ उच्च न्यायालय पुनरीक्षण शक्तीचा वापर करुन लागू होतात, याचा अर्थ असा आहे की उच्च न्यायालयाला कोणत्याही अंतर्वादिक आदेशा संदर्भात पुनरीक्षण करण्याचा अधिकार नाही. मग वर नमूद केलेल्या इतर तत्त्वांपैकी एका तत्त्वानुसार, व्यथित पक्षाच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी संहितेत कोणतीही तरतूद नसल्यामुळे अंगभूत शक्ती कार्यान्वित होईल.मात्र जर आक्षेपित आदेश पूर्णपणे अंतर्वादिक स्वरूपाचा असेल आणि १९९८ च्या संहितेअंतर्गत उच्च न्यायालयाच्या पुनरीक्षण शक्तीचा वापर करुन त्यात दुरुस्ती केली जाऊ शकते, तर उच्च न्यायालय आपल्या अंगभूत शक्ती वापर करण्यास नकार देईल.मात्र, आक्षेपित आदेशामुळे अशी परिस्थिती निर्माण होत असेल की, न्यायालयाच्या प्रक्रियेचा गैरवापर होत असेल किंवा न्यायाची उद्दिष्टे साध्य होण्यासाठी उच्च न्यायालयास हस्तक्षेप करणे आवश्यक ठरत असेल तर कलम ३९७(२) मधील कोणतीही गोष्ट उच्च न्यायालयाच्या

अंगभूत शक्तींच्या वापरावर मर्यादा आणू शकत नाही किंवा त्यावर परिणाम करू शकत नाही. पण अशी प्रकरणे फारच कमी असतील.उच्च न्यायालयाने आपल्या अंगभूत शक्तींचा वापर अतिशय कमी प्रमाणात केला पाहिजे."

३२. सत्य नारायण शर्मा विरुद्ध राजस्थान राज्य या खटल्यात या न्यायालयाने भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यातील तरतुदींचा विचार केला आणि भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यांतर्गत संपरीक्षेला स्थगिती देता येणार नाही असे म्हटले. याचा अर्थ असा नाही की फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ च्या तरतुदींचा अवलंब केला जाऊ शकत नाही, परंतु एखाद्या याचिकाकर्त्याने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत उच्च न्यायालयात धाव घेतली आणि त्या याचिकेवर संपरीक्षा झाली तर भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्याअंतर्गत संपरीक्षेला स्थगिती दिली जाऊ शकत नाही असे स्पष्ट करण्यात आले. याचिकेची सुनावणी जलदगतीने व्हावी यासाठी याचिकाकर्ते न्यायालयाला पटवून देऊ शकतात, परंतु केवळ न्यायालय लवकर सुनावणी देण्याच्या स्थितीत नसल्यामुळे संपरीक्षेला तात्पुरती स्थगिती दिली जाऊ शकत नाही. असे की, आम्ही या प्रस्तावाशी सहमत नाही की प्रक्रियेला स्थगिती देण्याच्या उद्देशाने दंड प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ चा अवलंब केला जाऊ शकतो. वरील आमच्या चर्चेतून हे स्पष्ट होते. (पान क्रमांक ८३२-८३४ )

तथापि, त्यानंतर, या न्यायालयाने परिच्छेद ३८ मध्ये या कायद्याचे वर्णन केलेः

" 38. फौजदारी प्रक्रिया संहिता ही निश्चितच स्वतःमधेच एक संपूर्ण संहिता आहे. आम्ही यापूर्वीच चर्चा केल्याप्रमाणे, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३९७(२) अंतर्गत विवेकाधीन अधिकार क्षेत्र केवळ अंतिम आदेश आणि दरम्यानचा आदेशांच्या संदर्भात वापरले पाहिजे.फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत असलेल्या अधिकाराचा वापर केवळ फौजदारी प्रक्रिया संहितेअंतर्गत पारित झालेल्या अंतर्वादिक आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा कोणत्याही न्यायालयाच्या प्रक्रियेचा गैरवापर रोखण्यासाठी किंवा न्यायाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी केला जाऊ शकतो.वर नमूद केल्याप्रमाणे, या अधिकाराचा वापर केवळ दुर्मिळ प्रकरणांमध्ये केला पाहिजे, अन्यथा नाही.जर अशी स्थिती असेल आणि आमचे असे मत असेल, तर राज्यघटनेच्या कलम २२६ आणि २२७ चा अवलंब करणे कदाचित सर्वात असाधारण प्रकरणाच्या बाबतीत अनुमत असेल.जेव्हा फौजदारी प्रक्रिया संहिता आरोपी व्यक्तीच्या फायद्यासाठी निष्पक्ष आणि जलद संपरीक्षा प्रतिबंधित करते तेव्हा उच्च न्यायालयाच्या घटनात्मक अधिकार क्षेत्राचा वापर करणे, हा प्रस्ताव स्वीकारणेआम्हाला कठीण वाटते कारण घटनेचे कलम २२६ आणि २२७ आरोपी व्यक्तीला उपलब्ध आहेत, या तरतुदींचा अवलंब अशा प्रकरणांमध्ये केला पाहिजे जे दुर्मिळ नाहीत तर किरकोळ मुद्द्यांसाठी आहेत.

(पान क्रमांक ८३५-८३६)

१७. आमच्या मते , उपरोक्त परिच्छेद २५, २९ आणि ३२मध्ये जे काही म्हटले आहे,

त्यानंतरही न्यायनिर्णयाचा मापदंड परिच्छेद ३८ मध्ये आढळतो , जे मधु लिमये (उपरोक्त ) मध्ये यापूर्वी काय ठरवण्यात आले होते ते अचूकपणे नमूद करणारे कायद्याचे स्पष्टीकरण आहे.न्यायनिर्णय एकसंध वाचाला गेला पाहिजे , आणि जर काही परस्परविरोधी भाग असतील,तर त्याच खंडपीठाच्या आधीच्या निर्णयाशी सुसंगत निकाल देण्यासाठी त्यांना सामंजस्याने जुळवून घ्यावे लागेल. निकालाच्या परिच्छेद ३० मध्ये मधू लिमये (उपरोक्त ) च्या परिच्छेद १० मधील एक भाग नमूद करण्यात आला आहे, जो दर्शवितो की मधू लिमये (उपरोक्त ) प्रकरणात अत्यंत महत्त्वाच्या सावधानपत्राशिवाय अमरनाथ (उपरोक्त ) मधील मुद्दयांना मान्यता दिली नाही याची न्यायालयाला पूर्ण जाणीव होती-आणि कलम ३९७ (२) मधील कोणतीही गोष्ट उच्च न्यायालय अंगभूत शक्तीच्या वापराला मर्यादा घालू शकत नाही किंवा त्यावर परिणाम करू शकत नाही.त्यामुळे आम्ही परिच्छेद ३८ चे वाचन केवळ न्यायनिर्णय प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ च्या प्रयोज्यतेच्या दृष्टीने नव्हे तर त्याचा वापर कसा करावा याबाबतही न्यायनिर्णयाचा योग्य मापदंड म्हणून केले आहे.

१८. कलम २२६ आणि २२७ अंतर्गत याचिकांसंदर्भात, ते एल. चंद्र कुमार विरुद्ध भारत सरकार आणि इतर, (१९९७ ) ३ एस. सी. सी. २६१ च्या पान नं. ३०१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संविधानाच्या मूलभूत रचनेचा भाग आहेत.करतार सिंग वि. पंजाब राज्य, (१९९४ )३ एस सी सी ५६९ च्या पान नं. ७१४ या खटल्यात घटनापीठाने दिलेल्या न्यायनिर्णय हे अगदी स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहेः

''तथापि, उच्च न्यायालयास घटनेच्या कलम २२६ अंतर्गत जामीनासाठी अर्ज स्वीकारण्याचे आणि १९८७ च्या कायद्यांतर्गत प्रकरणांशी संबंधित कोणत्याही प्रकारचे आदेश पारित करण्याचे अधिकार क्षेत्र नाही, केवळ अत्यंत दुर्मिळ आणि योग्य प्रकरणात असामान्य परिस्थितीतच या शक्तीचा सावधानीने वापर केला पाहिजे.परंतु न्यायालयीन शिस्त आणि न्यायालयांचे सौहार्द यासाठी आवश्यक आहे की उच्च न्यायालयांनी अशा प्रकरणांमध्ये असाधारण अधिकार क्षेत्राचा वापर करणे टाळले पाहिजे.''

गिरीश कुमार सुनेजा (उपरोक्त ) परिच्छेद ४० मध्ये कर्तारसिंग (उपरोक्त) च्या या पैलूचे पालन करण्यात आले आहे आणि आम्ही त्याशी पूर्णपणे सहमत आहोत.वरील चर्चेच्या पार्श्वभूमीवर दिल्ली उच्च न्यायालय न्यायनिर्णयाचा परिच्छेद ३३ (अ), (ब ) आणि (ड) मधील निकाल बाजूला ठेवला पाहिजे, हे स्पष्ट आहे.

१९. गोयल यांच्या न्यायनिर्णयानुसार अपील निकाली काढण्यात यावे, याच्याशी मी सहमत आहे.

**(न्या. आर. एफ. नरीमन)**

**नवी दिल्ली;**
**२८ मार्च, २०१८.**

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याची कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय  हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.